रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ४६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २२ जुलै २०२४

किंमत ४ ₹

## केरळमध्ये निपाहने मुलाचा मृत्यू

**मल्लपुरम :** केरळमधील मलप्पुरम येथील निपाह व्हायरसने ग्रस्त १४ वर्षीय मुलाचा रविवारी मृत्यू झाला. पीडित मुलाला सकाळी १०.५० वाजता हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्याला व्हेंटिलेटर सपोर्टवरही ठेवण्यात आले, मात्र सकाळी ११.३० वाजता त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात, बाधित मुलाला अँटीबॉडीज देण्यास विलंब झाला. मुलाचे अंत्यसंस्कार आंतरराष्ट्रीय प्रोटोकॉलनुसार केले जातील, असेही वीणांनी सांगितले. यासाठी मुलाचे कुटुंबीय आणि पालकांशी बोलणी सुरू आहेत.

## चंद्रपूरात मामा तलाव फुटला

**चंद्रपूर :** संपूर्ण विदर्भात मुसळधार पाऊस झाल्यामुळे अनेक गावांमध्ये पुरसदृष्य स्थिती निर्माण झाली. तर अनेक गावांचा संपर्क तुटला. चंद्रपूर येथील चिचपल्ली गावात मामा तलाव फुटल्यामुळे ३०० घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे अनेकांचा संसार उघड्यावर पडला. घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ना. मुनगंटीवार यांनी तात्काळ मदतकार्य पोहोचवा. चिचपल्ली गावाची प्रत्यक्ष पाहणी करा. तेथील नुकसानीचे पंचनामे करा. असे स्पष्ट आदेश पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# सावित्री नदीने गाठली धोका पातळी



- शहरात पुराचे पाणी शिरण्याची शक्यता
- नगरपालिकेने भोंगा वाजून जनतेला दिला इशारा
- महाडकरांसाठी आजची रात्र धोक्याची

**| रायगड | प्रतिनिधी |**

गेल्या ४८ तासात महाड, पोलादपूरच्या सर्व भागांमध्ये पडणाऱ्या अतिवृष्टीने पूरसदृश्य स्थिती निर्माण केली असून दोन्ही तालुक्यात सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्याची माहिती प्रशासनामार्फत देण्यात आली आहे. यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाने पहिला भोंगा वाजवून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

महाबळेश्वर व पोलादपूर येथे मुसळधार पर्जन्यवृष्टी सुरू असल्यानेमहाड, पोलादपूरकरांसाठी रविवारची रात्र धोक्याची असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली होती. ४८ तासात महाड,पोलादपूर तालुक्यात मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली. सद्यस्थितीमध्ये महाडच्या महिकावती मंदिराजवळ असणाऱ्या शासकीय यंत्रणेच्या म्हणण्यानुसार या ठिकाणची पाणीपातळी सहा पूर्णांक ५० एवढी आहे.

पोलादपूर तालुक्यातील निवे ताम्हाणे रस्त्यावर झालेल्या मुसळधार पावसात दरड कोसळली असून येथील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात मदतकार्य करण्यासाठी रेस्क्यू टीम यांना सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. दरम्यान रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीने देखील इशारा पातळी गाठली आहे.

महाड तालुक्याच्या रायगड वाळण परिसरामध्ये तुफान पर्जन्यवृष्टी सुरू असून वाळण विभागातील कलकत आदिवासी वाडी येथे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूच्या ओढ्यामध्ये पडून वाळणखुर्द येथील ज्येष्ठ नागरिक बाळाजी नारायण उतेकर यांचा मृत्यू झाल्याची माहिती तहसीलदार महेश शितोळे पान २ वर

## कुंडलिकेने गाठली इशारा पातळी

रायगड जिल्ह्यात सर्वत्र पाऊस पडत असून रोहा तालुक्याला त्याचा फटका बसला. शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात रात्रीपासून मुसळधार पाऊस पडला आहे. सकाळी तालुक्यात पाऊस जोरदार पडत होता. त्यामुळे डोंगर माथ्यावरून येणारे नदी, नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. दुपारी रोहा अष्टमी पुलाला पाणी लागले होते. रोहा अष्टमीला जोडणारा जुना पूल वाहतुकीस बंद ठेवण्यात आला आहे. वाहतूक नव्या पुलावरून सुरु आहे.रोहा नागोठणे मार्गावरील अष्टमी येथे रस्त्यावर पाणी आले होते. रात्री उशीरा तालुक्यात काही ठिकाणी नदीचे पाणी आले होते.यामुळे नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.

# भोप्याचीवाडी आदिवासीवाडीत घर कोसळले; चिमुकला बचावला



- चुलीतील आगीत हात भाजला
- नुकसानभरपाईची शासनाकडे केली मागणी

**| पाली | वार्ताहर |**

जिल्ह्यातसर्वत्रमुसळधारपाऊस सुरू आहे. या पावसात सुधागड तालुक्यातील भोप्याचीवाडी आदिवासीवाडीमधीलएकाघराच्या स्वयंपाक घराची भिंत व छत दुपारी कोसळले. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेला अडीच वर्षाचा चिमुकला थोडक्यात बचावला. मात्र चुलीतील आगीमुळे त्याचा हात भाजला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सोसाट्याचा वारा व मुसळधार पावसामुळे भोप्याचीवाडी आदिवासीवाडीत राहणारे हिरामण पवार यांच्या घराच्या स्वयंपाक घराची भिंत व छत अचानक कोसळले. यावेळी स्वयंपाक घरामध्ये अनुष पवार (वय अडीच वर्षे) हा भिजलेला असल्याने चुलीजवळ शेकत बसला होता. तर घरामध्ये दुसऱ्या खोलीत एक वयोवृद्ध महिला व आणखी एक महिला आणि चार लहान मुले बसली होती. स्वयंपाक खोलीचे कौलारू व लाकडी छत आणि भिंत अचानक खाली कोसळली. यावेळी अनुष येथून पटकन दुसऱ्या खोलीमध्ये पळाला मात्र चुलीतील निखारा त्याच्या हाताला लागल्याने त्याचा हात भाजला.

या संदर्भात अजून शासनाकडे कोणतीही नोंद करण्यात आलेली नाही. तसेच पंचनामादेखील झालेला नाही. असे राहिवासी अविनाश पवार यांनी सांगितले. मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे यांनी शासनाने झालेल्या नुकसानीचा त्वरीत पंचनामा करण्याची व नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

# बोरगावमध्ये घराची भिंत कोसळली



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ओलमन ग्रामपंचायतमधील बोरगांव या गावात एका आदिवासी कुटुंबाच्या घराची भिंत कोसळून नुकसान झाले आहे. भिंत कोसळल्याने घरातील साहित्याचे नुकसान झाले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घराच्या नुकसानीचा पंचनामा महसूल विभागाने पूर्ण केला आहे.

कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायत हद्दीतील बोरगांव गावातील संगीता चौरे यांच्या घराची भिंत कोसळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या जोरदार पाऊस सुरू असून शुक्रवारपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झालेले पाहायला मिळत आहे. तालुक्यातील पान २ वर

# केदारनाथ मार्गावर दरड कोसळली



**| उत्तराखंड | वृत्तसंस्था |**

केदारनाथ मंदिराकडे जात असताना मार्गावर मोठी दुर्घटना घडली आहे. चिरबासाजवळ दरड कोसळली आहे. त्यामुळे तीन यात्रेकरुंचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. आठजण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन यात्रेकरू महाराष्ट्रातील आहेत. जखमींना उपचारासाठी गौरीकुंड हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. प्रशासनाने यासंदर्भातील माहिती दिली आहे. सकाळी सात वाजताच्या सुमारास ही घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचलो होते. बचाव पथक देखील दाखल झाले होते. अद्याप बचावकार्य सुरु आहे. मृतांमध्ये महाराष्ट्रातील किशोर अरुण पराटे (वय ३१) नागपूर पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**राजीनामा पुरेसा नाही**

**वे|ध|क**

## गुटख्याची वाहतूक करणारा अटकेत

**कोलाड :** रोहा तालुक्यातील ताम्हिणी घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील भिरा फाटा ते विळे येथे पेट्रोलिंग करताना कोलाड पोलिसांनी विमल गुटखा, सुगंधी तंबाखूची वाहतूक करणारी कार ताब्यात घेतली. या कारमधील कारचालक आणि दहा लाख १८ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. कोलाड पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते, पोसई नितीन चौधरी, सहा सहा पो उपनिरीक्षक नरेश पाटील,पो.ह. कृष्णा म्हात्रे, पो.शि.डी एन पांचाळ यांचे पथक शनिवारी रात्री पेट्रोलिंग करण्यासाठी ताम्हिणी घाट रस्त्याकडे रात्री एक वाजण्याच्या सुमारास गेले होते. यावेळी भिराफाटा ते विळे जाणाऱ्या रस्त्यावर १,१८,३२० रुपये किम तीचा विमल गुटखा व विमल पान मसाला कोलाडच्या दिशेने घेऊन येणारी कार आढळली. पान २ वर

# ‘ई-रिक्षांची संख्या वाढवा’

**| माथेरान | वार्ताहर |**

माथेरानमध्ये पहिल्यांदाच ई-रिक्षासारख्या पर्यावरण पूरक वाहनाचीसुविधाउपलब्धझाल्यामुळे मागील दोन महिन्यांपासून विशेष करून शनिवारी आणि रविवारी वर्षासहलीसाठी पर्यटकांचा महापूर याठिकाणी पाहवयास मिळत आहे. परंतु अवघ्या वीस ई-रिक्षा या सर्व पर्यटकांना सुविधा देण्यास अपुऱ्या पडत असल्याने स्थानिकांसह पर्यटकांकडून ई-रिक्षात वाढ करण्याची मागणी केली जात आहे.



यंदाच्या पावसाळ्यात दोन लाख पर्यटक केवळ स्वस्त, सुरक्षित आणि जलद वाहतुकीच्या सुविधेमुळे ई-रिक्षाला अधिक पसंती देताना दिसत असून ई-रिक्षातून प्रवास करण्यासाठी स्थानकावर ताटकळत उभे असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. पान २ वर

> माथेरानला ई-रिक्षांची संख्या खूपच कमी प्रमाणात असल्याने लोकल माणसांना आणि पॅसेंजरला एकएक करून रिक्षा दिल्या गेल्या. त्यामुळे अर्धा तास या रिक्षांची वाट पाहावी लागली.युनियनने आणखीन ई-रिक्षा वाढविल्या पाहिजेत म्हणजे कुणाचाही वेळ जाणार नाही.
>
> – सामर्थ्य वाडेकर, पर्यटक नाशिक

# अनधिकृत रेंटबाईकमुळे रिक्षा व्यवसायिक अडचणीत

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

‘बाईक ऑन रेंट’ या व्यवसायाला मान्यता नसल्याचे पेण येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाने सांगितले आहे. तरीदेखील हा व्यवसाय अलिबागमध्ये राजरोसपणे सुरू आहे.अनधिकृत रेंटबाईकमुळे रिक्षा व्यवसायिक अडचणीत आले आहेत. बेकादेशीर व्यवसायाविरोधात ठोस कारवाई करण्याची मागणी केली जात असताना ती होत नसल्याची खंत रिक्षा व्यवसायिकांनी व्यक्त केली आहे.



अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे असताना ऐतिहासिक ठिकाण म्हणून अलिबागची एक वेगळ ओळख आहे. अलिबागला फिरण्यास येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. अलिबागसह काशिद, मुरुड, नागाव, किहीम, आक्षी, रेवदंडा या समुद्रकिनारी पर्यटकांची वर्दळ कायमच राहिली आहे. वाढत्या पर्यटनामुळे अलिबागमधील रिक्षा व्यवसायाला रोजगार उपलब्ध होत आहे. तालुक्यात एक हजार २०० हून अधिक रिक्षा आहेत. यातील अनेकांनी कर्ज काढून रिक्षा घेतल्या आहेत. परंतु अलिबागमध्ये गेल्या काही महिन्यांपासून ‘बाईक ऑन रेंट’ हा व्यवसाय सुरू झाला आहे. सुमारे २२ ठिकाणी हा व्यवसाय सुरू पान २ वर

> रेंट बाईकचा व्यवसाय अनधिकृत आहे त्यांनी कोणतीही परवानगी घेतली नाही, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मिळाली. वेगवेगळ्या विभागाकडे लेखी तक्रार केली. परंतू आम्हाला अजूनपर्यंत न्याय मिळाला नाही.
>
> – शरद राऊत, अध्यक्ष अलिबाग ऑटो रिक्षा व्यवसायिक संघटना

# आता यंत्र करणार समुद्रकिनारे स्वच्छ

- जर्मन तंत्रज्ञानाचा घेणार आधार
- चार अत्याधुनिक यंत्र रायगड जिल्ह्यामध्ये दाखल



**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने पुढाकार घेतला आहे. समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता यांत्रिक पद्धतीने होणार आहे. यासाठी कोकणातील सात जिल्ह्यांसाठी सात मशिन्स उपलब्ध करून दिले जाणार आहेत. या अंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी चार अत्याधुनिक यंत्र दाखल झाले आहेत.

समुद्र किनाऱ्याची स्वच्छता राखणे स्थानिक प्रशासनासाठी मोठे जिकरीचे काम ठरत होते. मनुष्यबळाचा वापर करून विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता राखणे अशक्य ठरत होते. पान २ वर

> जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्याची स्वच्छता सुलभ व्हावी यासाठी चार यंत्र महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळाने उपलब्ध केली आहेत. ज्यामुळे किनारपट्टीची स्वच्छता सुलभपणे होऊ शकेल. श्रीवर्धन, नागाव, काशिद आणि किहीम या चार ठिकाणी दिली जाणार आहेत.
>
> – रविंद्र शेवाळे, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विभाग

## ‘बांगलादेशींना आश्रय देणार’

**| कोलकाता | वृत्तसंस्था |**

पश्चिम बंगालचे दरवाजे बांगलादेशी आश्रितांसाठी नेहमी खुले असतील. निर्वासितांबाबतच्या संयुक्त राष्ट्राच्या ठरावाचा संदर्भ देत ममता बॅनर्जी म्हणाल्या की, मी बांगलादेशबद्दल फार बोलू शकत नाही, कारण तो वेगळा देश आहे. यावर बोलण्याचा केंद्र सरकारला अधिकार आहे. पण मी एवढे सांगू शकते की, बांगलादेशमधील पीडितांनी पश्चिम बंगालचा दरवाजा ठोठावला, पान २ वर

# डॉक्टरांअभावी आपला दवाखाना बंद




- तालुक्यात आरोग्य यंत्रणेचे वाजले तीनतेरा
- शासनाचा लाखो रुपयांचा खर्च गेला पाण्यात

**| तळा | वार्ताहर |**

तळा शहरात सुरू करण्यात आलेला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना डॉक्टरांअभावी गेल्या दहा महिन्यांपासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे या दवाखान्यासाठी दर महिन्याला शासनाकडून भाडे स्वरूपात देण्यात येणारे अठरा हजार रुपये वाया जात असून तळा तालुक्यात सध्या आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

१ मे २०२३ रोजी तळा मांदाड रस्त्याशेजारी असलेल्या जागेत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने लोकार्पण करण्यात आले होते. शहरी भागातील नागरिकांना आरोग्याच्यादृष्टीने उपयोग व्हावा यासाठी राज्यस्तरावरून हे आरोग्यवर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आले होते.मात्र या ठिकाणी डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली नसल्याने अवघ्या चार महिन्यातच हा दवाखाना बंद पडला आहे. सुरुवातीस डॉ.भुरके यांच्यासह एक स्टाफ नर्स व एक आरोग्य सेवक यांची नेमणूक करण्यात आली होती. मात्र डॉ. भुरके गेल्यानंतर त्यांच्या जागी डॉक्टर उपलब्ध झाला नसल्याने परिणामी आपला दवाखाना बंद पडला आहे.

दहा महिन्यांपासून हा दवाखाना बंद असल्याने दर महिन्याला अठरा हजार रुपये प्रमाणे शासनाचा निधी वाया जात आहे. त्यामुळे शासनाने आपला दवाखानामध्ये डॉक्टर व कर्मचारी वर्ग मंजूर करावा तसेच आपला दवाखाना शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू करावा जेणेकरून गरजू रुग्णांना त्याचा लाभ घेता येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**पालकांच्या मोबाईलवर येणार एसएमएस**

# 93 हजार विद्यार्थ्यांना आरटीईची लॉटरी

**सुयोग आंग्रे**

**| रायगड |**

शहरातील नावाजलेल्या शाळांमध्ये आपल्या पाल्याला शिक्षण देण्याचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील पालकांचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. उच्च न्यायालयाने जनहित याचिका आणि रिट याचिकेवर १९ जुलैला अंतिम निर्णय दिला आहे. यामुळे राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये आरटीई प्रवेशासाठी १ लाख ५ हजार २२३ जागासाठी २ लाख ४२ हजार ५१६ पालकांनी अर्ज सादर केले होते. यापैकी तब्बल ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना आरटीईच्या सोडतीची लॉटरी लागली आहे.

एसएमएस सोमवारपासून पाठविण्यात येणार असून ज्या पालकांना एसएमएस येणार नाहीत अशा पालकांना बालकांच्या प्रवेशासाठी आता प्राथमिक शिक्षण विभागाने पर्यायी संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ७ जून २०२४ रोजी सोडत काढण्यात आली होती. याची निवड यादी व प्रतीक्षा यादी https://student.maharashtra.gov.in/adm_portal येथे पाहायला मिळणार आहे. पान २ वर

**प्रवेशाची माहिती शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर**




## आरटीईसाठी पात्र विद्यार्थी

रायगड ३५१६, अहमदनगर २९०१, अकोला १९१८, अमरावती २३००, औरंगाबाद ४२४२, भंडारा ७६०, बीड २०२६, बुलढाणा २४११, चंद्रपूर १४०२, धुळे ११०२, गडचिरोली ४२४, गोंदिया ८८३, हिंगोली ७५४, जळगाव २८२६, जालना १७५६, कोल्हापूर २३९४, लातूर १७९६, मुंबई ४७३५, नागपूर ६६४८, नांदेड २४८३, नंदुरबार २९८, नाशिक ४८०७, उस्मानाबाद ९७०, पालघर २६७७, परभणी १२५३, पुणे १६३३७, रत्नागिरी ५७०, सांगली १३४९, सातारा १६६८, सिंधुदुर्ग १२०, सोलापूर २१९४, ठाणे ९५९७, वर्धा ११७९, वाशीम ८७१ आणि यवतमाळ जिल्ह्यात १८४२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## दाखल प्रस्ताव

राज्यातील २ लाख ४२ हजार ५१६ पालकांनी आपले प्रस्ताव सादर केले होते. यामध्ये रायगड ७३६३, अहमदनगर ७३८७, अकोला ४८८९, अमरावती ६६२६, औरंगाबाद १५१०३, भंडारा १९५५, बीड ५८००, बुलढाणा ५३८६, चंद्रपूर ३०४९, धुळे २८४९, गडचिरोली ८८३, गोंदिया ३०२९, हिंगोली १८४६, जळगाव ७८१०, जालना ५१२८, कोल्हापूर ३८९४, लातूर ५७६२, मुंबई १९६६८, नागपूर २०३४३, नांदेड ८९५३, नंदुरबार ८८०, नाशिक १४७८६, उस्मानाबाद २४१०, पालघर ३६६०, परभणी ३१४५, पुणे ४८१५५, रत्नागिरी ७७७, सांगली २३६५, सातारा ३५४२, सिंधुदुर्ग १६३, सोलापूर ५२८१, ठाणे १९५६८, वर्धा ३०२०, वाशीम २०४७ आणि यवतमाळ जिल्ह्यात ४७६८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ जुलै
१) श्री. बसवंत पांडुरंग गावडे
चेंढरे, अलिबाग, २२-७-१९४४
२) श्रीम. शुभांगी रमेश आंब्रे
नागाव, अलिबाग, २२-७-१९५२

## मनाली मोहिते यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

देवकान्हे गावच्या मनाली गणेश मोहिते यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ३७ वर्षे



होते. मनाली मोहिते या काही दिवसांपासून ताप आल्याने आजारी होत्या. त्यांना मंगळवारी (दि.१६) अधिक अस्वस्थ वाटू लागल्याने रोह्यातील एका इस्पितळात दाखल करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली असा परिवार असून त्यांचे अंतिम धार्मिकविधी रविवारी (दि.२८) देवकान्हे येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.


# मोरबे धरण ५१ टक्के भरले!

## धरणात दमदार पाऊस, आतापर्यंत १६२६ मिमी पावसाची नोंद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

जून महिन्यात नवी मुंबई शहरात व धरणात पावसाचे प्रमाण कमी असल्याने सर्वांचेच डोळे पावसाकडे लागले होते. नवी मुंबई शहरात गेल्यावर्षीच्या तुलनेत जून महिन्यात कमी पाऊस झाला. त्यामुळे आधीच सुरु असलेल्या पाणीकपातीत वाढ होणार की काय असा प्रश्न नवी मुंबईकरांना पडला होता. परंतु मागील काही दिवसापासून मोरवे धरण परिसरात दमदार पाऊस होतअसून मोरबे धरण ५१ टक्के भरले आहे. त्यामुळे यंदाही मोरवे धरण १०० टक्के भरण्याचे अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

नवी मुंबई शहरात जून महिना संपल्यानंतरही आवश्यक तेवढा पाऊस झाला नाही. त्यामुळे मोरबे धरणातला साठाही कमी होऊ लागला होता. गेल्यावर्षीच्या तुलनेत मोरबे व शहरातही कमी पाऊस झाला असल्याने



नागरीकांची व प्रशासनाची चिंता वाढली होती. त्यामुळे शहरात व मोरबे धरण परिसरातही पावसाचे प्रमाण कमी असल्याने पालिकाही योग्य खबरदारी घेत असून दैनंदिन पाऊस तसेच पाणीपुरवठा याबाबत बारकाईने लक्ष ठेऊन असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. ९ जूनला मोरबे धरण परिसरात व शहरात पावसाला सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीला पावसाचे प्रमाण कमी होते. परंतु मागील आठवड्यापासून मोरबे धरण परिसरात दमदार पाऊस पडत असल्याने मोरबे धरणाची पातळी झपाट्याने वाढू लागली आहे सद्या मोरबे धरणात ५१ टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### मोरबे धरणातील पाणीसाठा सद्यस्थिती

आतापर्यंत पडलेला एकूण पाऊस
१६२६.८ मिमी.
धरणात झालेला पाणीसाठा
९८.४४७ (५१.५७%)
दशलक्ष घनमीटर
धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता
१९०.८९ दशलक्ष घनमीटर



## यशवंतनगर हायस्कूलच्या नाटिकेचा गौरव

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

साक्षरता अभियानांतर्गत यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून जनजागृती करण्यासाठी सादर केलेल्या नाटिकेला सर्वोत्तम पसंती मिळाली आहे.

मुरूड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी दिलेल्या आदेशानुसार यशवंतनगर हायस्कूलने मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर नाटिका व पोवाडा सादर केला होता. त्यात शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन जनजागृती करण्यात आली होती. शाळेच्या विद्यार्थी कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट अभिनयाने या नाटिकेला न्याय दिला. या नाटिकेसाठी शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील यांचे मार्गदर्शन, सागर राऊत यांनी केलेली संगीत साथ, भारत चव्हाण, महादू अहिरे, शिल्पा कळके, महेश वाडकर आदी शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १५१ शाळेतील विद्यार्थ्यांना द लाईफ फाऊंडेशन मुंबई या संस्थेच्या वतीने शुक्रवारी (दि. १९) रोजी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सुधागड तालुक्यातील गरीब, गरजू, आदिवासी व इतर सर्व समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी सुविधा पुरविणे या मुख्य हेतूने या संस्थेने हा उपक्रम हाती घेतला असल्याचे संस्थेचे प्रकल्प प्रमुख शिवानंद यांनी स्पष्ट केले

'द लाईफ फाउंडेशन' या संस्थेने जागतिक महामारीमध्ये सुधागड तालुक्यातील खेडोपाडी मदत केली आहे. मागील वर्षी संस्थेच्या वतीने सुधागड तालुक्यातील ८१ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले होते. यावर्षी गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे व दर्यागाव शाळेचे मुख्याध्यापक राजू बांगारे यांनी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याची विनंती द लाईफ फाऊंडेशन संस्थेला केली. त्यानुसार सुधागड तालुक्यातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.

या कार्यक्रमाच्या वेळी गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, लाईफ फाऊंडेशनचे विनोद, शिलानंद व त्यांचे सहकारी, केंद्रप्रमुख कल्पना पाटील, खरात, मोरेश्वर कांबळे, कैलास म्हात्रे, संजय थळे, तालुक्यातील सर्व शाळांचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

## धामणसई येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील प्राथ. शाळा धामणसई येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

मागील तीन वर्षांपासून येथील शिक्षक शशिकांत शेळके यांच्या पाठपुराव्याने सर्व विद्यार्थ्यांना सिव्हिल इंजिनिअर सुरज मोकल, सिव्हिल इंजिनिअर अजय विश्वकर्मा यांच्या सहयोगाने शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत आहेत.

यावर्षी ११ हजार रुपये किंमतीच्या ३० डझन रजिस्टर वह्या, ग्रुप ग्रामपंचायत धामणसई सरपंच नेहा जंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत व कार्यतत्पर आदरणीय केंद्रप्रमुख रश्मी साळी यांच्या अध्यक्षतेखाली व धामणसई गाव अध्यक्ष शंकर कदम यांच्या विशेष उपस्थितीत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक जयेश भोईर, उपशिक्षक शशिकांत शेळके, कृष्णा नाकती, राणी इंगळे व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माणगावमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। माणगाव । वार्ताहर ।**

रा.जि.प.चरई शाळा , गौलवाडी आदिवासी वाडी शाळेत पारिजात संस्था मुंबई यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. संस्थेचे पदाधिकारी वैभव कदम व त्यांचे सहकारी, शाळेचे मुख्याध्यापक जगदीश कासे व सहशिक्षिका कल्याणी वाजे ,पालक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट मिळाल्याबद्दल शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच मुलांना शालोपयोगी वस्तू प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.या मदतीचा विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयोग होईल असा विश्वास मुख्याध्यापक जगदीश कासे यांनी व्यक्त केला. पारिजात संस्था मुंबई यांचे ग्रामस्थ व शिक्षकांनी आभार व्यक्त केले. पारिजात संस्थेचे पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

## प्राण्यांची कत्तल केल्याप्रकरणी केली मारहाण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बेकायदेशीरपणे प्राण्यांची कत्तल करून त्याची विक्री करत असताना विरोध केल्याप्रकरणी मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आली. या प्रकरणी सात जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अंतर्गत आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

कैलास रेपाळे हा कळंबोली येथे राहत असून तो प्राण्यांची अवैध वाहतूक रोखणे, प्राण्यांवर होणारे अत्याचार, अवैध कत्तल थांबवण्याचे कामे करतो. १७ जुलै रोजी प्रतीक ननावरे यांच्याकडून तळोजा गावच्या हद्दीत त्यांच्या घरी असलेल्या बीफ शॉप मध्ये गोवंशय जनावरांची कत्तल करून मटण विक्री करणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सकाळी सहा वाजता विशाल बिंद, प्रतीक ननावरे, तेजस पाटील हे तळोजा पोलिसांची मदत घेऊन त्या ठिकाणी गेले. यावेळी बंद शटरमध्ये प्राणी कत्तलीचे काम चालू होते. शटरच्या पाठीमागील बाजूस काही जनावरे बिना पाण्याची, चाऱ्याची सोय न करता कृरतापूर्वक आखूडपणे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवलेली दिसून आली.

पोलिसांनी दरवाजा खोलण्यास सांगितले मात्र दरवाजा उघडला नाही. पोलिसांनी दरवाजा ढकलला. पोलीस आणि सर्व सहकारी बीफ शॉपच्या आत मध्ये गेले. त्यावेळी काही इसम प्राण्यांची कत्तल करून मांस विक्री करत होते. यावेळी काहींनी कैलास रेपाळे याला याच्यावर हल्ला केला आणि शिवीगाळ व धमकी देऊन मारहाण केली. याप्रकरणी सलमान सजीर पटेल, सफपान सजीर पटेल, आताऊल्ला इस्माईल खान, अब्दुल कादिर पटेल, असिम सिराज पटेल, नौमान अब्दुल रहीम नमरे, मोहम्मद हनीफ पटेल यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पान १ वरून

## सावित्री नदीने गाठली धोका पातळी

यांनी दिली आहे. मागील ४८ तासात होणाऱ्या तुफानी मुसळधार पर्जन्यवृष्टीने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. महाड आणि पोलादपूर या दोन्ही तालुक्यात स्थानिक प्रशासन येणाऱ्या सर्व आव्हानात्मक परिस्थितीला सज्ज असल्याची ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली आहे. महाडमध्ये असणाऱ्या एनडीआएफच्या पथकाला कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. किल्ले रायगड मार्गावरील गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असलेला लाडवली पुलाचे काम पूर्ण झाल्याने पडणाऱ्या मुसळधार पावसाची नोंद घेऊन राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मार्गावरून छोट्या वाहनांमधून जाण्यासाठी हा मार्ग खुला केल्याची माहिती देण्यात आली आहे. यामुळे या परिसरातील सुमारे पाच हजार नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आज सकाळपासून छोट्या वाहनांसाठी हा मार्ग खुला करण्यात आल्याची माहिती प्रशासनामार्फत तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत देण्यात आली आहे. येत्या आठ दिवसानंतर जड वाहनांना या मार्गावरून जाण्याच्या परवानगी बाबत निर्णय घेण्यात येईल असेही स्पष्ट करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात दिवसभरात झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे पाच कच्च्या घरांचे तर एका पक्क्या घराचे नुकसान झाले आहे. नुकसानीच्या पंचनाम्याचे काम युद्धपातळीवर प्रशासनाने सुरु केले आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील जनाबाई किसान पाटील यांच्या पक्क्या घराचे अंशतः नुकसान झाले. तळा तालुक्यातील चरई लाल माती आदिवासीवाडी येथील गोपाळ सीताराम हिलम, महाड तालुक्यातील नेराव येथील अनुसया जयराम कोरपे, पार्वती कोरपे आणि माणगाव तालुक्यातील कोल्हाण येथील अजित सीताराम कदम, अर्चना पावसकर यांच्या कच्च्या घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. महाड तालुक्यातील पांगारी येथील स्मशानभूमीच्या शेडचे नदीला आलेल्या पुरामुळे नुकसान झाले आहे.

## गुटख्याची वाहतूक करणारा अटकेत

ही कार अजय उखाराम चौधरी खेड शिवापुरचा तरुण चालवत होता. त्यास पोलिसांनी थांबवून विचारपूस केली असता त्या कारमध्ये विमल गुटखा आणि सुगंधी तंबाखू असल्याचे निष्पन्न झाले. यामुळे अजय चौधरी याला ताब्यात घेत कोलाड पोलिसांनी गुन्हा दाखल करून १० लाख १८ हजार ३२० रुपयांचा माल जप्त केला आहे.

## ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना आरटीईची लॉटरी

सोडतीद्वारे शाळेमध्ये प्रवेशासाठी निवड झालेल्या बालकांच्या पालकांना त्यांनी नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर सोमवारपासून (दि.२२) एसएमएस येण्यास सुरुवात होईल. प्रवेश मिळाल्याचा संदेश आलेल्या पालकांनी २३ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत आपल्या जिल्ह्यातील संबंधित तालुकास्तरावरील पडताळणी समितीकडे कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी केले आहे.

## समुद्र किनाऱ्यांवर होणार यांत्रिक स्वच्छता

प्रामुख्याने पावसाळ्यात समुद्रातील कचरा मोठ्या प्रमाणात किनारपट्टीवर वाहून येत असतो, यात प्लास्टिक व इतर प्रकारच्या कचऱ्याचा समावेश असतो. सामाजिक संस्थांच्या मदतीने अधूनमधून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता मोहीम राबविली जात होती. मात्र यात सातत्य राखणे अवघड असल्याने किनारे अस्वच्छ राहण्याचे प्रमाण मोठे होते. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळाने पहिल्यांदाच समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला आहे. किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे. यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने कोकणातील सर्व जिल्ह्यांसाठी समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी प्रत्येकी एक बॉब कॅट नामक मशिन दिले होते. दुसऱ्या टप्प्यात बीच टेक कंपनीची जर्मन बनावटीची मशिन्स एमपीसीबीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही मशिन्स ट्रक्टरच्या सहाय्याने समुद्रकिनारी वापरता येणार आहे. समुद्र किनाऱ्यावरील रेती चाळून त्यातील कचरा साफ करण्याचे काम या माध्यमातून करता येणार आहे.रायगड जिल्ह्यासाठी ४ मशिन्स उपलब्ध झाली असून श्रीवर्धन, नागाव, किहीम आणि काशिद या चार समुद्र किनाऱ्यांवर ही मशिन्स दिली जाणार आहेत. स्थानिक ग्रामपंचायती अथवा नगर पालिकांना या मशिन्सच्या व्यवस्थापनाचा खर्च करावा लागणार आहे. देखभाल दुरुस्ती कंपनीच्या माध्यमातून केली जाणार आहे.या मशिनच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता केली जाईल. कचरा उचलणे, त्याचे संकलन करणे, संकलित केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाळूत साचलेल्या कचऱ्याचे संकलन करणे, वाळूचे सपाटीकरण करणे यासारखी कामेही केली जाऊ शकणार आहेत. यंत्राच्या देखभाल दुरुस्तीचा खर्चही कंपनीच्या माध्यमातून केला जाणार आहे.

## केदारनाथ मार्गावर दरड कोसळली

महाराष्ट्र, सुनील महादेव काळे (वय २४) जालना महाराष्ट्र, अनुराग बिष्ट, तिलवाडा रुद्रप्रयाग यांचा समावेश आहे. गौरीकुंड ते केदारनाथ असा १६ किलोमीटर अंतराचा पायी मार्ग आहे. यादरम्यान अनेकदा भूस्खलनाच्या घटना घडत असतात. चीरबासा हा भूस्खलन होण्यासाठीच ओळखला जातो. पावसामध्ये अशा घटनांमध्ये वाढ होत असते. मलबा, मोठे दगडं पडल्याने अपघात होत असतात. मागच्या वर्षी अशाच अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला होता. त्यामुळेच हा मार्ग जोखमीचा म्हटला जातो. केदारनाथ यात्रा मार्गावर असलेल्या गौरीकुंड इथे आज सकाळी दरड कोसळल्याची घटना घडली आहे. काही वेळेतच उत्तराखंड राज्याची आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी घटनास्थळी पोहचली असून जखमींना मदत आणि दरड हटवण्याच्या कामाला सुरुवात झाली होती.

## 'ई-रिक्षांची संख्या वाढवा'

सध्या सहा महिन्याच्या पायलट प्रोजेक्ट वर ह्या ई-रिक्षा सुरू असून केवळ वीस ई-रिक्षा सेवा देत आहेत. परंतु पर्यटकांचा वाढता ओघ पाहता या सुध्दा कमी पडत असल्याने अनेकांना नाईलाजाने पायपीट करावी लागत आहे. लवकरच ह्या सेवेत वाढ करण्यात यावी अशी मागणी मोठया प्रमाणावर जोर धरू लागली आहे. वीस ई-रिक्षा जून महिन्यात सुरू झाल्या पासून दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत आहे. अवघ्या पस्तीस रुपयात पर्यटक दस्तुरी नाका टॅक्सी स्टँडपासून थेट गावात येत असल्याने सर्वांची पायपीट वाचली आहे. मात्र वीस ई-रिक्षांची संख्या अपुरी पडत आहे. पर्यटकांना तासनतास रांगेत उभे रहावे लागत आहे.

सुप्रीम कोर्टाने ई-रिक्षाची संख्या निश्चित करण्याची जबाबदारी सनियंत्रण समितीला दिली असल्याने उर्वरित ७४ हात रिक्षा चालकांना लवकरच ई-रिक्षांची परवानगी द्यावी, अशी मागणी ई-रिक्षा चालक मारुती कदम यांनी केली.

## बोरगावमध्ये घराची भिंत कोसळली

बोरगांव गावातील संगीता हरिश्चंद्र चौरे यांच्या घराची भिंत कोसळून नुकसान झाले आहे.शनिवारी घराची भिंत कोसळली असून घरातील वस्तूंची नासधुस झाली आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र सुमारे ५० हजाराचे नुकसान झाल्याचे चौरे यांनी सांगितले आहे. दरम्यान स्थानिक सरपंच व तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामे करून अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवले आहेत.प्रशासनाकडून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी चौरे यांनी केली आहे.

## अनधिकृत रेंटबाईकमुळे रिक्षा व्यवसायिक अडचणीत

असून याचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. दुचाकी पर्यटकांना दुचाकी भाड्याने देण्याची दुकाने गॅरेज, काही हॉटेल परिसरात खुलेआम सुरू आहेत. उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या म्हणण्यानुसार या व्यवसायिकांनी परवाने काढली नाहीत. कोणतीही परवानगी घेतली नाही. त्यामुळे हा व्यवसाय अनधिकृत असल्याचे सांगण्यात आले आहे. रेंट बाईकमुळे रिक्षा व्यवसायिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. त्याचा व्यवसायावर विपरित परिणाम होऊ लागला आहे. सध्याच्या परिस्थितीनुसार कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे, कर्ज फेडणे कठीण होऊन बसले आहे. रेंट बाईकचाअनधिकृत व्यवसाय बंद करण्यात यावा अशी मागणी अलिबागच्या रिक्षा चालक, मालकांनी केली आहे. याबाबत उपप्रादेशिक परिवहन विभाग, वाहतूक शाखा व अलिबाग पोलिसांना निवेदनही दिले आहे. परंतु त्यांच्या विरोधात कारवाई केली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## 'बांगलादेशींना आश्रय देणार'

तर मी नक्की मदत करेन आणि त्यांना आमच्या राज्यात आश्रय देईन. ज्यांचे नातेवाईक हिंसाचारग्रस्त बांगलादेशात अडकले आहेत, अशा सर्व बंगालमधील रहिवाशांसाठी आम्ही मदत करू. बांगलादेशाबाबत कुठल्याही अफवांना बळी पडू नये. फक्त बंगालच भारताचे अस्तित्व सुरक्षित करू शकतो, बंगालशिवाय भारत नाही. बांगलादेशातील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी म्हणाल्या . कोलकाता येथे शहीद दिनाच्या रॅलीनिमित्त व्हिक्टोरिया हाऊससमोर आयोजित सभेला संबोधित करताना ममता यांनी बांगलादेशातील जनतेला पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. भाजपवर आरोप करताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, भाजपने लोकांना धमकावून आणि एजन्सीचा गैरवापर करून केंद्रात सरकार स्थापन केले आहे. अनेक लढाया लढल्या गेल्या आहेत आणि अजून बऱ्याच लढायच्या आहेत. मी जिवंत असेपर्यंत लढेन, असेही ममता यावेळी म्हणाल्या.

## शिळफाटा-खोपोली रस्त्यावर पाणी

**खोपोली :** तालुक्यात सुरू असलेल्या पावसामुळे खोपोली शहरातील बहुसंख्य रस्ते पाण्याखाली गेले; तर मुंबई-पुणे महामार्गावर शिळफाटा-खोपोलीदरम्यान ठिकठिकाणी पाणी साचले होते.सखल भागातील रस्ते व अंतर्गत नाले, गटारी तुंबले होते. तीन दिवस मुसळधार पावसामुळे शहरातील दरडग्रस्त रहिवासी वस्त्या व डोंगरमाथ्यावरील वस्त्यांना नगरपालिका प्रशासन व तालुका प्रशासनाकडून सावधगिरी बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे. लोकल पंधरा ते वीस मिनिटे उशिराने धावत होत्या.एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक संथ गतीने सुरू होती.

## बेपत्ता महिला तपासात कुचराई; महिला पोलीस उपनिरीक्षक निलंबित

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बेपत्ता विवाहित महिला तपासप्रकरणी दिरंगाई केल्याप्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक मीना वऱ्हाडी यांना निलंबित करण्यात आले आहे.

नवी मुंबईतील एक विवाहित महिला ६ तारखेला घरगुती कारणांनी घरातून निघून गेली. तिच्या सासरच्या लोकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती नातेवाईक परिचित आणि माहेरीही गेली नसल्याने तिचे पती आणि वडिलांनी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार देण्यासाठी आले असता त्यांचा तात्काळ जबाब नोंद करून घेण्यात आला नाही.

तसेच गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून बेपत्ता महिलेचा तपास चालू केला नाही. रहिला बेपत्ताप्रकरणी तात्काळ कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे आदेश असताना दिरंगाई केली.

त्यामुळे नैतिक दृष्ट्या जनमानसांमध्ये पोलीस दलाविषयी संभ्रम व संशय निर्माण करून पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन केली आहे, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली. बेपत्ता झालेली रहिला शीळ फाटा येथील मंदिरात गेली होती. तिला चहातून गुंगीचे औषध टाकून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला गेला, तसेच तिची निर्घृण हत्याही करण्यात आली होती.



## म्हसळ्यात उनाड गुरांचा सुळसुळाट

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तालुका, शहर बाजार पेठेत आणि नागरी वस्तीत उनाड गुरे भटकत असल्याने नागरिकांची आणि व्यापारी वर्गाची गैरसोय होत आहे. त्याच बरोबर भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. उनाड गुरे व भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नागरिकांनी म्हसळा नगर पंचायतकडे मागणी केली आहे.

म्हसळा तालुका शहरात उनाड गुरांचे मालक आहेत, पण ते अदृश्य असल्याचे खासगीत सांगितले जाते. काही विपरीत किंवा अपघाती घटना घडली किंवा ती चोरीला गेली तर त्यांचे मालक भरपाई मागण्यासाठी पुढे सरसावतात. मात्र उनाड गुरे रोज दुकानदारांचे किंवा ग्राहकांचे खाद्य सामान ओरबाडून खातात तेव्हा तेथे कोणीही पुढे येत नाही ही मोठी तफावत आहे. उनाड गुरे दिवसा रस्त्यांवर बसतात तर रात्री एसटी स्थानकात, शासकयि कार्यालयांच्या आवारात, दुकानांच्या ओसरीला किंवा सोसायटयांमध्ये मोकळ्या आवारात बसत असल्याने त्यांचा शेणगोठा दुकान मालक व नोकरदार यांना करावा लागतो. हा त्रास आता नित्याचाच झाला असल्याने रोज मरे त्याला कोण रडे अशीच काहीशी अवस्था आहे. म्हसळा नगर पंचायतकडे कोंडवाडा आहे पण कारवाई बंद आहे. नगर पंचायत प्रशासनाने उनाड गुरांचा कायम उपाय म्हणून दवंडी पिटून ती गो-शाळेत जमा करावीत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

निवडक

## अजगराला जीवनदान

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील सांबरी येथील मोहन शेळके यांच्या घराच्या मागील आवारात भला मोठा अजगर दिसून आला. या अजगराची बातमी सर्वत्र पसरली आणि गावात एकच खळबळ उडाली. यानंतर परिस्थितीचा गांभीर्य लक्षात घेऊन अजगर जातीच्या जनावरास कसे पकडायचे, असा प्रश्न पडला होता. परंतु तेथे असलेल्या एकाने सर्पमित्र सतीश म्हात्रे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहचून भल्या मोठ्या दहा फुटी अजगराला सुरक्षितपणे पकडून जीवनदान देत जंगलात सोडण्यात आले.

## अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी

**वावोशी :** आपल्या धारदार लेखणीतून असंख्य कथा, कादंबऱ्या, पोवाडा, लावण्या, वग लिहिणारे साहित्यसम्राट, लोकशाहीर अणणाभाऊ साठे यांची पुण्यतिथी खोपोली येथील अण्णाभाऊ साठे समाज मंदिरात साजरी करण्यात आली. यावेळी खोपोलीचे माजी नगरसेवक डॉ. सुनील पाटील, हरीश काळे, महाराष्ट्र राज्य अखिल भारतीय मातंग संघाचे महासचिव शंकर कुंडले व महाराष्ट्र राज्य मातंग समाज सेवा संघाचे अध्यक्ष प्रल्हाद बट्टवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शैक्षणिक साहित्य वाटप

**उरण :** सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने स्थापित झालेल्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशनतर्फे रांजणपाडा येथील वडिलांचे छत्र हरपलेल्या तेजस्वी नरेंद्र तांडेल या अकरावीत शिकत असलेल्या गरीब विद्यार्थिनीस वह्या, पुस्तके, शाळेचा गणवेश आणि शैक्षणिक फी च्या स्वरूपात आर्थिक मदत देण्याचा कार्यक्रम धुतुम येथील कार्यालयात पार पडला. यावेळी असोसिएशनच्या मदती सोबतच धनाजी ठाकूर यांच्यावतीने ५ हजारांची मदतही या विद्यार्थिनीस देण्यात आली.

## बसेसवर लाडकी बहिण

**नवी मुंबई :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची माहिती नवी मुंबईतील सर्व महिलांपर्यंत पोहोचावी व या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळावा, यादृष्टीने नवी मुंबई आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध माध्यमांतून योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने काही एनएमएमटी बसेसवर चारही बाजूने योजनेचे माहितीप्रद पॅनल प्रदर्शित करून बसेस आकर्षकरित्या सजविण्यात आल्या आहेत.

## गुरू भक्तांचा सागर उसळला

**धाटाव :** गुरुपौर्णिमेनिमित्त रायगड जिल्ह्यासह इतर विभागातून पुरुषोत्तम पाटील यांचे असंख्य अनुयायी धाटावमधे हजर झाले. आपल्या गुरूवर निस्सीम प्रेम आणि आदर व्यक्त करण्याचा दिवस असल्याने पाहाटे पासूनच त्यांच्या घरासमोर अनुयायांची भली मोठी रांग लागल्याचे पहावयास मिळाले. दुग्धअभिषेक केल्यानंतर त्यांना औक्षण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी आपल्या प्रबोधनाच्या माध्यमातून आपल्या असंख्य अनुयायांना उपकृत केले.

# प्रवाशांच्या जीवाशी खेळ

| अलिबाग | प्रतिनिधी |

**सर्वसामान्यांची जीवनवाहिनी समजली जाणारी एसटी आता जीवघेणी वाहिनी बनू लागल्याचे चित्र समोर येत आहे. सतत एसटीमध्ये बिघाड, ब्रेक फेल होणे, एसटीच्या छपरातून पाण्याची गळती, खिडक्या तुटलेल्या, जुन्या इंजिनच्या गाड्यांना रंगरंगोटी करून रस्त्यावर पाठविणे अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या जिवाशी खेळ खेळला जात असल्याचा आरोप केला जात आहे.**

■ गळतीसह खिडक्या तुटलेल्या
■ वारंवार रस्त्यात एसटीचा बिघाड

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, कर्जत, महाड, माणगाव, श्रीवर्धन, रोहा, मुरूड ही आठ आगार असून, १९ बसस्थानके आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये ३७७ हून अधिक एसटी बसेस आहेत. यातील दीडशे एसटी बसेसची वयोमर्यादा आठ वर्षापेक्षा जास्त आहे. या बसमधून धूर मोठ्या प्रमाणात निघतो. प्रदूषण रोखण्यासाठी रायगड जिल्ह्यातील या बसेसला मुंबईत प्रवेश बंद केला आहे. त्यामुळे रायगडसह अन्य जिल्ह्यात या बस धावत आहेत. प्रदूषणामुळे पर्यावरणावर त्याचा परिणाम होत. मानवी आरोग्यदेखील बिघडत आहे. धूर काढणाऱ्या या दीडशे गाड्यांवर भरोसा ठेवून लाखो प्रवासी प्रवास करतात.



जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून पाऊस सुरु आहे. एसटी बसला गळती लागली आहे. पावसाचे पाणी बसमध्ये पडत असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहे. एसटी बसच्या खिडक्या तुटलेल्या असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक वेळा छत्री, रेनकोट आधार घेत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे.

एसटीला गळती लागू नये यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. त्यामुळे खर्च नक्की कुठे केला, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक बसेस सतत रस्त्यात बंद पडत आहेत. ब्रेक न लागणे, एक्सल तुटणे, अशा अनेक प्रकारच्या घटना घडत आहेत. याबाबत चालकांकडून तक्रारी केल्या जातात. मात्र, त्यावर योग्य ती कार्यवाही केला जात नाही, असे बोलले जात आहे. जिल्ह्यातील एसटीच्या गलथान कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. याकडे विभाग नियंत्रक दिपक घोडे यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### सीएनजी पंपाचे काम संथगतीने

**अलिबाग एसटी बस आगारात सीएनजीवर चालणाऱ्या बसेस लवकरच दाखल होणार आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून स्थानकात सीएनपी गॅस पंप उभारण्याचे काम सुरु आहे. मात्र, अद्यापपर्यंत हे काम पूर्ण झाले नाही. सीएनजी पंपाचे काम संथगतीने चालू आहे. सीएनजीवर चालणाऱ्या बसेसची प्रवाशांना प्रतीक्षा लागून राहिली आहे.**

### ५७ बसेस भंगारात


**रायगड जिल्ह्यात ३७७ एसटी बसेस आहेत. या बसेसपैकी ५७ एसटी बसेस १५ वर्षांपेक्षा अधिक वयोमर्यादा झाली आहे. त्यामुळे या बसेस रस्त्यावर धावण्यालायक नसल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. या बसेस भंगारात गेल्या आहेत.**

> **जिल्ह्यात ३७७ बसेस आहेत. लवकरच सीएनजीवर चालणाऱ्या ३०० बसेस दाखल होतील. अलिबाग स्थानकातील सीएनजी पंपाचे काम अंतिम टप्प्यात असून, महिनाअखेरपर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.**
> **- संदीप शिंदे, यंत्र अभियंता, विभाग नियंत्रक कार्यालय, रायगड**

## शाफिक शेख यांचे निधन

| माथेरान | वार्ताहर |

शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते तसेच माथेरान शेकापचेशहरअध्यक्षशाफिकदाऊत शेख यांचे कर्करोगाच्या आजाराने शनिवारी (दि.२०) वयाच्या ६६ व्या वर्षी निधन झाले. शाफिक शेख मागील अनेक वर्षांपासून माथेरान शेकाचे शहर अध्यक्ष होते. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील



यांचे निष्ठावंत कार्यकर्ते अशी त्यांची माथेरान शहरात ओळख होती. त्यांनी माथेरान शहरात रायगड जिल्हा सहकारी बँकेची शाखा सुरू केली. यासाठी त्यांनी आपल्या पक्षाचे सर्वेसर्वा जयंत पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता. तसेच, माथेरान शहराचे अनेक प्रश्न त्यांनी वेळोवेळी आपल्या पक्षश्रेष्ठींकडे मांडले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे, भाऊ असा मोठा परिवार आहे.



## राजपुरी समुद्रकिनारी लाटांचे तांडव

| मुरूड-जंजीरा | वार्ताहर |

मुरूड तालुक्यात वादळी पावसाची संततधार सुरू असून खाडीपट्ट्यात बिगरयांत्रिक मासेमारी देखील बंद करावी लागली आहे. समुद्रकिनाऱ्यावर कधी मुसळधार वादळी पाऊस तर कधी वादळी वारे असे वातावरण असून रविवारी (दि.२१) दुपारपर्यंत ७२ मिमी पावसाची नोंद झाली.

यादरम्यान तालुक्यातील राजपुरी समुद्रकिनारी दुपारच्या सुमारास मोठी भरती आल्याने समुद्राच्या लाटा आठ फुट उंच उसळत होत्या. याबाबत माहिती देताना राजपुरी येथील मच्छीमार धनंजय गिदी यांनी सांगितले की, वादळी वारे, पौर्णिमा, अमावस्या जवळ आली की समुद्रात लाटांचा जोर वाढतो. याला कोळी बोली भाषेत पाणी फुगून मोठी भरती येते असे म्हटले जाते. यावेळी या लाटांची उंची वाढून किनाऱ्यावर दीड ते दोन तास जोरदारपणे धडकत असतात. राजपुरी येथील श्री बाळ गणेश मंदिरासमोरील किनारी कॉंक्रीट चौथऱ्यावर सुमारे ८ फुट उंच उसळणाऱ्या लाटांचे तांडव धडकी भरविणारे असले तरी समुद्राच्या भरतीचे उधाण मच्छीमार आणि राजपुरी ग्रामस्थ किनाऱ्यावरून पाहत होते.

## पाच कोटी खर्चूनही रस्ता नाही


| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर शेलू गावाजवळ सार्वजनिक बांधकाम खात्याने मोठा पूल बांधला आहे. त्या पुलाच्या निर्मितीसाठी शासनाने तब्बल पाच कोटींचा निधी खर्च केला आहे. मात्र, त्या पुलाच्या दोन्ही बाजूंचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग मागील वर्षभरात बांधून पूर्ण करू शकले नाही. दरम्यान, रस्त्यासाठी शेलू बाजूकडे आणि पलीकडे निकोप मोहाली गावाकडे स्थानिक शेतकऱ्यांनी जमीन देण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे



या पुलाच्या मानिवली ग्रामपंचायत बाजूकडील रस्ते हे माळरानातून त्या पुलाजवळ पोहचत आहेत. त्यामुळे त्या बाजूचा रस्ता तयार करायला कोणत्याही अडचणी नाहीत असे स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र, शेलू गावाच्या बाजूला अस्तीत्वात असलेला रस्ता हा अगदी अरुंद आहे. त्यात सध्याचा रस्ता हा शेलू गावातून जात असून गावातील बहुसंख्य रस्ते हे अरुंद असल्याने मोठी वाहने त्या रस्त्याने जाण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे शेलू गावाच्या बाहेरून रस्ता काढल्यास तो रस्ता थेट रेल्वे फाटकात पोहचू शकतो आणि हाच रस्ता भविष्यातील नियोजनासाठी महत्वाचा असणार आहे. मात्र, त्या पूर्ण ६००-७०० मीटर रस्त्यावर शेलू गावातील ग्रामस्थांच्या शेत जमीन आहेत. त्यामुळे शेत जमिनीमधून रस्ता करायला जागा कोण देणार, असा प्रश्न आहे.

## खारअंबोली धरणावर पर्यटकांची रेलचेल



(छायाचित्र : सुधीर नाझरे)

| मुरुड-जंजिरा | वार्ताहर |

मुरुड तालुक्यात संततधार पावसामुळे तालुक्यातील धरणे-धबधबे तुडूंब भरून वाहु लागले आहेत. त्यामधील पर्यटकांना आकर्षित करणारा अंबोली धरण व सवतकडा धबधबा पुर्णतः भरून वाहू लागल्याने या ठिकाणी पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे. परंतु, लोणावळ्याला झालेल्या अपघातामुळे शासनाने बंदी घातली असल्याने पर्यटकांमध्ये नाराजीचा सुर उमटत आहेत. मुरुड पासून काही अंतरावर असलेला सवतकडा धबधबा व अंबोली धरणात डोंगर, कपारी, कातळावर साठलेले पावसाचे पाणी एकत्र येऊन पुढे मोठा प्रवाह निर्माण होतो. या प्रवाहात पोहण्यासाठी व आनंद घेण्यासाठी स्थानिक तसेच पर्यटक येत असतात. धबधब्याच्या वरच्या बाजूला अत्यंत संथ वाहणारे पाणी जेव्हा मोठ्या खडकावरुन खाली कोसळते तेव्हा ते चित्र मनाच्या आतील कप्प्यात कायमस्वरूपी बंद करून ठेवण्या इतपत सुंदर आणि नेत्रदीपक असते. त्याबरोबर धरणाच्या आजुबाजुला गर्द वनराईत पसरलेल्या हिरव्या वेली, रंगबेरंगी फुले, त्यावर बागडणारी फुलपाखरे, पक्षाचा किलबिलाट आणि अंगाला झोंबणारा गार वारा या सर्व निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी हजेरी लावत असतात.

## दिघी परिसर नॉटरिचेबल

| श्रीवर्धन | वार्ताहर |

देशातील तीन प्रमुख खासगी दूरसंचार कंपन्या जीओ, एअरटेल आणि व्ही यांनी त्यांच्या टॅरिफ प्लॅनच्या किंमतींमध्ये वाढ केली आहे. कंपन्यांचे हे नवे दर ३ जुलैपासून देशात लागू करण्यात आले असून श्रीवर्धन, दिघी, बागमांडला, हरीहरेश्वर, दिवेआगर, म्हसळा, आंबेत परिसरांत फार मोठ्या प्रमाणांत एअरटेलचे ग्राहक आहेत. त्यातच दिघीला व्यवसाय निमीत्ताने येणाऱ्यांनी सुध्दा अन्य कंपन्यांचे कनेक्शन एअरटेलला ट्रान्स्फर केले आहे. परंतु, असे असताना दिघी परिसरामध्ये गेली कित्येक दिवस नेटवर्कच्या समस्येमुळे सर्वच नागरिक त्रस्त झाले आहेत.

तसेच, काहीच अंतरावर सुवर्ण गणेश मंदिर असल्यामुळे पावसाळी असंख्य पर्यटक या मार्गाने या स्थळाला भेट देत असतात. त्यांना ऑनलाईन व्यवहार करण्या संदर्भात बऱ्याच समस्या येत आहेत. याच गावामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे विकसित होणारे अदानी दिघी पोर्टला भेट देणारे असंख्य उद्योजक तसेच ट्रान्सपोर्ट संदर्भात ऑनलाइन व्यवहार, डिझेलचे पैसे व अन्य ऑनलाइन व्यवहार करण्यास जिकरीचे ठरत आहे. या परिसरातील वाड्या, डोंगराळ भागांमध्ये पावसाळी परिस्थिती असल्यामुळे एखादा नागरिक आजारी पडला तर रिक्षा तसेच डॉक्टर सेवा मिळण्याकरिता संपर्क करण्याकरिता नेटवर्क नसल्यामुळे स्थानीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## सालवड येथे बेवारस महिलेचा मृतदेह

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील सालवड येथील नसरापूर भागात झाडाला लटकलेल्या अवस्थेत एका ३५ वर्षीय महिलेचे प्रेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. चेहऱ्यावर ॲसिड अथवा केमिकल टाकून ओळख पुसण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या महिलेचे प्रेत हे चार ते पाच दिवस आधीचे असून एका ग्रामस्थाच्या निदर्शनास आले होते. यानंतर स्थानिक पोलीस पाटील यांनी कर्जत पोलीस ठाण्यात या संबंधीत माहिती दिली. कर्जत पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आहे. शवविच्छेदनानंतर अधिक माहिती समोर येईल असे सांगण्यात आले.

## अर्ज भरणा शिबीर संपन्न

| रसायनी | वार्ताहर |

तुराडे ग्रामपंचायतीच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज भरणा शिबीर नुकतेच उत्साहात पार पडले. या शिबिराला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी महिलांना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात आणि जास्तीत जास्त महिलांना या योजनानाचा लाभ मिळावा यासाठी मंडळ अधिकारी कोरेगावकर, कविता माने, ठक्करवाड, अस्मिता मोकळ व मोकाशी यांनी लाभार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी मदत केली.

यावेळी सरपंच रंजना गायकवाड, रिया माळी, लीना ठाकूर, मालती वाघमारे, प्रमिला कातकरी तसेच अंगणवाडी सेविका सावंत, गायकर, पाठारे, आशा वर्कर जमा साखरकर, प्रतीक्षा चव्हाण, प्रेमा माळी तसेच विलास पाटील, विश्वनाथ गायकवाड, प्रदीप माळी, मयुर ठाकूर, संतोष वाघमारे व इतर कार्यकर्ते उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी केला.



## चिरनेर गावात जंगली वानरांचा उच्छाद

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर गावात जंगली वानरांनी घरांच्या छपरांवर उड्या मारून उच्छाद मांडला असून, ही जंगली वानरे गेल्या सात ते आठ दिवसांपासून गावात घुसली आहेत. दरम्यान, कळपाने धुडगूस घालणारी हि सात ते आठ वानरे असल्याची माहिती ग्रामस्थांकडून प्राप्त झाली आहे. तसेच, या वानरांचा वनविभागाने वेळीच बंदोबस्त करावा, अशी मागणी चिरनेर ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.



उरण तालुक्यातील ग्रामीण भागाचा झपाट्याने विकास होत आहे. मात्र, हा विकास नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास करीत आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी डोंगर पोखरून मातीचे उत्खनन झाले आहे. याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आले असून, त्यांचा अधिवास नष्ट होत चालला आहे. त्यामुळे त्यांना अन्नासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे या वानरांनी गावात प्रवेश केला असल्याचे बोलले जात आहे. मात्र, याचा त्रास आता गावकऱ्यांना सहन करावा लागत आहे. ही वानरे घरांच्या छपरांवर उड्या मारून घरांचे नुकसान करत आहेत. शिवाय पावसापासून घराचे संरक्षण व्हावे यासाठी वापरण्यात आलेली ताडपत्रीही फाडून टाकत असल्यामुळे घरांना गळती देखील लागली आहे.

## निसर्ग चक्रावर उत्खननाचा परिणाम

# पशु-पक्ष्यांच्या निवाऱ्यावर घाला

| पाली/बेणसे | वार्ताहर |

**वाढते औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात डोंगर पोखरले जात आहेत. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हासा सोबतच पावसाळ्यात अनेक पक्षी, कीटक आणि इतर वन्यजीवांवर त्याचा परिणाम होत आहे. तसेच, अनेक पक्षांचा अधिवास व खाद्य नष्ट झाले आहे. अशा नोंदी येथील निसर्ग व पशुपक्षी अभ्यासकांनी नोंदवल्या आहेत.**

माणगाव तालुक्यातील पाटणूस येथील निसर्ग व पशुपक्षी अभ्यासक शिक्षक राम मुंडे यांनी यासंदर्भात नुकतेच सर्वेक्षण केले आहे. विळे, पाटणूस भागाड परिसरात भटकंती करताना त्यांना अनेक ठिकाणी डोंगर पोखरलेले दिसले. राम मुंडे यांनी सांगितले की, या मुरमाड किंवा मातकट टेकड्यांवर अनेक झाडे वर्षानुवर्षे बहरत असतात. विशेष म्हणजे स्थानिक परिस्थितीशी व वातावरणाशी सुसंगत अशी जैवविविधता असल्याने विशिष्ट झाडे या भागात असतात. पावसाळ्यात या झाडांवरती कावळे, कोतवाल, नारंगी कस्तुर, नाचण, ठिपकेवाला होला असे वेगवेगळे पक्षी घरटी बांधतात. या झाडांच्या खोडावरील सालींमधे अनेक कीटक अंडी देऊन आपली जीवनप्रक्रिया पुढे चालू ठेवत असतात. तर, झाडांच्या मुळांपाशी मुंग्या व वाळव्या आपले वारूळ बांधून संपूर्ण पावसाळ्यात पुरेल एवढा अन्नसाठा साठवून ठेवत असतात. यांच्याच जोडीला पावसाळ्यात अनेक सरपटणारे जीव सरडे, पाली, साप, घोरपड हे याच भागात अंडी देत असतात. तर विंचू, खेकडे, गोगलगाई, चोपई अशा प्रकारच्या जीवांचे सुद्धा याच भागात वास्तव्य असते. पांढऱ्या छातीचा धीवर (खंड्या), तिबोटी खंड्या, सामान्य धीवर, नीलकर्ण किलकिला खंड्या पक्षी हे याच भागातील मातीमध्ये बीळ बनवून आपली घरटी तयार करून पिल्लांची वाढ करत असतात.



परंतु, अनेक ठिकाणी इमारत व घर बांधकाम, रस्ते व भरावासाठी दगड, खडी, मुरूम किंवा मातीचा उपयोग केला जातो. मग हे दगड खडी, माती किंवा मुरूम मिळवण्यासाठी डोंगर किंवा टेकड्या पोखरल्या जात आहेत. हि बाब गंभीर व चिंताजनक असून निसर्गचक्रामध्ये याचा प्रतिकूल दीर्घ दीर्घकालीन परिणाम होत आहेत.

> **उत्खननामुळे कळत नकळत जैवविविधता, पर्यावरण व निसर्गात अनेक बदल होत चालले आहेत. त्यामुळे वेळीच यावर योग्य व ठोस उपयोजना करणे गरजेचे आहे. जेणेकरून येथील पशुपक्षी सूक्ष्मजीव व निसर्ग चिरकाल टिकेल.**
> **- राम मुंडे, पर्यावरण व पशुपक्षी अभ्यासक**




## पुन्हा 'नीट' परीक्षा घ्यावी- निखिल डवळे

| रसायनी | वार्ताहर |

राष्ट्रीय चाचणी संस्थेमार्फत वैद्यकीय अभ्यासक्रम यासाठी असलेली प्रवेश परिक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेमध्ये झालेल्या गोंधळाबद्दल हि परिक्षा पुन्हा घेण्यात यावी. या प्रमुख मागणीसह रायगड जिल्हा युवक काँग्रेसच्यावतीने जिल्हाध्यक्ष निखिल डवळे यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारच्या विरोधात रायगडात आंदोलन करण्यात आले. यावेळी उरण विधानसभा अध्यक्ष रोहित घरत, उपाध्यक्ष लंकेश ठाकुर, खालापूर तालुका अध्यक्ष निलेश ठोंबरे, ग्रामपंचायत सदस्य अदित्य घरत, जिल्हाध्यक्ष कुणाल जाधव, प्रदेश सचिव शयान उस्मानी, सरचिटणीस अश्विथ थळी, बूथ अध्यक्ष सुजित पाटिल व युवक काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

# राजीनामा पुरेसा नाही

पूजा खेडकर प्रकरण हा एका व्यक्तीचा भ्रष्टाचार नाही. व्यवस्थेमध्ये तिच्या भ्रष्टाचाराला साह्य करणारे अनेक जण आहेत. हे तिला व तिच्या पालकांना अर्थातच ठाऊक होते. याचाच अर्थ इतरही अनेक जण या भ्रष्ट मार्गांचा अवलंब करीत असणार. यामुळे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या एकूण कारभाराबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे हा संशय अधिक बळकट झाला आहे. सोनी यांची नियुक्ती अलिकडेच झाली होती व त्यांची पाच वर्षांची मुदत बाकी होती. आपण वैयक्तिक कारणास्तव पद सोडत असल्याचे सोनी यांनी म्हटले असले तरी त्यावर सहजासहजी विश्वास ठेवणे कठीण आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. तिच्यामार्फत होणाऱ्या परीक्षा अत्यंत कठीण व प्रतिष्ठित मानल्या जातात. सरकारी यंत्रणेत जिल्हाधिकारी, खात्यांचे सचिव, परदेशी राजदूत किंवा प्राप्तिकर आयुक्त वा त्यांच्या समकक्ष पदांवर नियुक्त्या होण्यासाठीच्या परिक्षांना सर्वाधिक महत्व दिले जाते. पण सरकारी सेवेतील इतरही श्रेणींमधील अनेक महत्वपूर्ण अधिकाऱ्यांची नियुक्ती आयोगामार्फतच होते. यामुळे आयोगाचे काम हे निःपक्ष व सर्व विवादांच्या वरचे असावे अशी अपेक्षा असते. सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोग यांच्याप्रमाणे तो स्वायत्त आहे व तो थेट राष्ट्रपतींना उत्तरदायी असतो. पूजा खेडकर प्रकरणाने ती पुरती धुळीला मिळाली आहे. पूजा खेडकर या तरुणीने वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या नावांनी परीक्षा दिली. पत्तेही वेगवेगळे सादर केले. सह्यादेखील बदलल्या. तिच्या गटानुसार तिला नऊ वेळा परीक्षेला बसणे संमत होते. पण ती बारा वेळा परिक्षेला बसली. शेवटच्या प्रयत्नात ती लेखी परीक्षा पास झाली. त्यानंतर तिने दृष्टिदोष व मानसिक अपंग असल्याचे प्रमाणपत्र मिळवले. तिचे गुण कमी असतानाही या कथित अपंगत्वाच्या आधारे तिने आयएएसमध्ये प्रवेश मिळवला.

### प्रमाणपत्रांचा भ्रष्टाचार

या संदर्भात तिने ऑल इंडिया मेडिकल सायन्सेसमार्फत तपासणी करून घेणे अपेक्षित होते. त्यासाठी तिला बोलावण्यातही आले होते. पण तिने त्याकडे चक्क दुर्लक्ष केले व पुण्याच्या व नगरच्या इस्पितळाचे प्रमाणपत्र सादर केले. विशेष म्हणजे तिने तीन वेळेला तीन वेगवेगळी प्रमाणपत्रे दिल्याचे उघड झाले आहे. हे सर्व आयोगाने मान्य कसे केले असा सवाल आता निर्माण झाला आहे. तिला मसुरीत प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यापूर्वी याची काटेकोर तपासणी झाली नाही असा याचा अर्थ होतो. पूजाचे प्रकरण उघड झाल्यानंतर आता अनेक उमेदवार दृष्टिदोष हे अपंगत्व असल्याचे दाखवून प्रवेश मिळवतात असे बोलले जात आहे. हे खरे असेल तर आयोगाचे अधिकारी याला सामील असले पाहिजेत. त्यामुळे याची समग्र चौकशी केली जाण्याची गरज आहे. देशातील नोकरशाहीच्या नियुक्त्यांमध्ये सर्वोच्च अधिकार असणाऱ्या प्रतिष्ठित संस्थेला भ्रष्टाचाराची अशी कीड लागलेली असेल तर ते सर्वात धोकादायक म्हटले पाहिजे. असा भ्रष्टाचार करून नोकऱ्या मिळवलेले नोकरशहा पुढे सेवेत काय हैदोस घालत असतील याची कल्पनाच केलेली बरी. पूजावर आयोगाने आपली बनावट ओळख दाखवून अर्ज केल्याबद्दल दिल्ली पोलिसांमध्ये गुन्हा दाखल केला आहे. मात्र तिने ओबीसी क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र कसे मिळवले व ते आयोगाने कसे मान्य केले हा पुढचा गंभीर सवाल आहे. पूजाचे वडील दिलीप खेडकर हे यंदाच्या लोकसभेला वंचित बहुजन आघाडीचे नगरमधील उमेदवार होते. त्यावेळी दाखल प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांनी आपले उत्पन्न चाळीस कोटी दाखवले होते. पूजाची भानगड उघड झाल्यानंतर गेल्या महिनाभरात खेडकर कुटुंबाचे फ्लॅट्स, कंपन्या, जमिनी इत्यादींचे तपशील चक्रावून टाकणारे आहेत. ओबीसी श्रेणीतून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांच्या पालकांचे उत्पन्न आठ लाखांहून अधिक असू नये असा नियम आहे. त्याला वळसा घालण्याचे प्रयत्न नेहमीच होत असतात. पूजाने देखील आपल्या आईवडिलांचा घटस्फोट झाला आहे असा दावा केला व वडिलांचे उत्पन्न आपल्याला ठाऊक नव्हते असे म्हटले आहे.

### सर्वांची तपासणी करा

हा सर्वच प्रकार कायद्याला व लोकांना मूर्ख समजणारा आहे. पण असे प्रमाणपत्र देणाऱ्यांची भ्रष्ट साखळी या व्यवस्थेत कशी निर्माण झाली आहे यावरही या प्रकरणातून प्रकाश पडतो. एरवी एखाद्या खरोखरच्या गरीब मुलाला उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पन्नास खेटे मारावे लागतात. पूजासारख्या धनदांडग्या व भ्रष्टांची कामे सहजपणे होतात. दुसरे म्हणजे ही प्रमाणपत्रे सादर केल्यानंतर त्यांची वस्तुस्थिती तपासण्याची कोणतीही स्वतंत्र यंत्रणा कोणत्याच खात्याकडे नाही हेही या निमित्ताने उघड झाले आहे. मात्र लोकसेवा आयोगासारख्या संस्थेकडेही ती नसावी हे भयंकर आहे. अर्थात, अशी पोलिसांसारखी एखादी यंत्रणा समजा उभी केली तर भ्रष्टाचाराचे नवीन कुरण खुले होण्याचा धोका आहे हेही खरेच. दरम्यान, पूजाच्या भानगडीमुळे आता ओबीसी क्रीमी लेअरमधून प्रवेश घेतलेले अनेक उमेदवार संशयाच्या भोवऱ्यात अडकणार आहेत. यासाठी गेल्या किमान पाच वर्षात सादर झालेल्या अशा प्रमाणपत्रांची कसून तपासणी करण्याची गरज आहे. आज कोणताही राजकीय पक्ष ओबीसींना दुखावू इच्छित नाही. त्यामुळे या मागणीला कोणीही पाठिंबा देणार नाही. मात्र लोकसेवा आयोगाच्या निवड प्रक्रियेवर लोकांचा विश्वास कायम राहायला हवा असेल तर हे आवश्यक होणार आहे. ओबीसींमध्ये जे उमेदवार खोटे प्रमाणपत्र देऊन प्रवेश मिळवतात ते खऱ्या गरजू व पात्र ओबीसींवर अन्याय करीत असतात हे या समाजातील लोकांनी लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे खरे तर ओबीसी संघटनांनीच ही मागणी उचलून धरायला हवी. अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिलेले डॉक्टर्स आणि अशी प्रमाणपत्रे देऊन आरक्षित कोट्यातून सरकारी नोकरी मिळवणारे तरुण यांचीही सखोल चौकशी या निमित्ताने केली जायला हवी. एकीकडे ओबीसी व मराठा आरक्षणाचा वाद पेटलेला असताना आरक्षणातील ही भानगड समोर आली आहे. त्यामुळे तर जनतेच्या मनातील संशयाचे पूर्ण निराकरण झालेच पाहिजे. केवळ सोनींनी राजीनामा देऊन भागणार नाही.

**विचार**

# खेळांची लज्जतदार मेजवानी

*'कोपा अमेरिका', 'युरो चषक' या उत्कंठावर्धक स्पर्धांचे अंतिम सामने, विम्बल्डन पुरुष एकेरीचा अंतिम सामना आणि भारत-झिम्बाब्वेदरम्यानचा टी-२० सामना अशी लज्जतदार मेजवानी एकाच दिवशी चाहत्यांना मिळाली. जगज्जेत्या अर्जेंटिनाने 'कोपा अमेरिका' स्पर्धेचे तर स्पेनने 'युरो' चषकाचे विजेतेपद पटकावले. स्पेनचाच कार्लोस अल्कराझ 'विम्बल्डन' पुरुष एकेरीचा विजेता ठरला तर भारताने ४-१ ने मालिका जिंकली. क्रीडाविश्वातील या अविस्मरणीय अंतिम सामन्यांचा खास वेध.*

**श्रीशा वागळे**

गेला रविवार कोणाच्या चेहऱ्यावर हासू तर कोणाच्या डोळ्यात अश्रू घेऊन आला. या रविवारी क्रीडाक्षेत्रात बरेच काही घडले. खरे तर तो क्रीडा चाहत्यांसाठी सुपर संडेच होता. फुटबॉल, टेनिस आणि क्रिकेटच्या महत्त्वाच्या सामन्यांनी हा दिवस सजला होता. तिकडे अमेरिकेच्या मियामीमध्ये कोपा अमेरिका स्पर्धेचा अंतिम सामना रंगला तर जर्मनीच्या बर्लिनमध्ये युरो कप स्पर्धेचा अंतिम सामना पार पडला. इंग्लंडमध्ये विम्बल्डन पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्याची उत्सुकता ताणली गेली होती तर हरारेमध्ये भारतीय क्रिकेट संघ पाच सामन्यांच्या मालिकेतला अंतिम सामना जिंकणार का, याचे ठोकताळे बांधले जात होते. अवघे क्रीडा क्षेत्र उत्साहाने न्हाउन निघाले होते. फुटबॉल चाहत्यांसाठी तर डबल धमाकाच होता. एकीकडे कोपा अमेरिका तर दुसरीकडे युरो चषकाच्या अंतिम सामन्याचा थरार पहायला मिळणार होता. कोपा अमेरिका स्पर्धेत अर्जेंटिना आणि कोलंबिया या दोन संघांमध्ये अंतिम चुरस पहायला मिळाली तर युरो चषकाच्या अंतिम सामन्यात स्पेन आणि इंग्लंड भिडले. विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात सर्बियाचा नोवाक जोकोविच आणि स्पेनचा कार्लोस अल्कराझ आमनेसामने होते. मागील वर्षीचा अंतिम सामनाही जोकोविच आणि अल्कराझ यांच्यातच झाला होता. त्यावेळी अल्कराझने अनुभवी जोकोविचला धूळ चारली होती. त्यामुळे यंदा जोकोविच त्या पराभवाचा वचपा काढणार का, याबाबत टेनिसप्रेमींमध्ये कुतुहल होते. मात्र यंदा अल्कराझने तीन सरळ सेटमध्ये जोकोविचवर मात केली. तिकडे भारतीय क्रिकेट संघानेही पाचव्या आणि अंतिम टी-२० सामन्यात झिम्बाब्वेवर अगदी सहज मात केली.

फुटबॉलबद्दल बोलायचे तर युरो चषक आणि कोपा अमेरिका या फुटबॉल विश्वातल्या अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धा. युरोपमधल्या संघांमध्ये युरो चषकाचा थरार रंगतो तर दक्षिण अमेरिकेतले फुटबॉल खेळणारे देश कोपा अमेरिका स्पर्धेत एकमेकांशी दोन हात करतात. या दोन्ही स्पर्धांचे महत्त्व त्या त्या खंडांमध्ये विश्वचषकापेक्षा तसूभरही कमी नाही. म्हणूनच अर्जेंटिना आणि कोलंबिया यांच्यातला अंतिम सामना प्रेक्षकांनी घातलेल्या गोंधळामुळे उशीरा सुरू झाला तर युरो चषकाच्या अंतिम सामन्यानंतर स्पॅनिश आणि इंग्लिश फुटबॉल चाहते एकमेकांना भिडल्याचे वृत्त समोर आले. युरो चषक आणि कोपा अमेरिका या अत्यंत प्रतिष्ठेच्या स्पर्धा जिंकण्यासाठी सहभागी संघांमध्ये चुरस असल्याचे नेहमीच पहायला मिळते. अर्जेंटिनाने सलग दुसऱ्यांदा कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अर्जेंटिनाचे हे सोळावे कोपा अमेरिका विजेतेपद. सोळावे विजेतेपद पटकावत अर्जेंटिनाने उरुग्वेला मागे टाकले. इतकेच नव्हे तर कोलंबियाची सलग २८ विजयांची घोडदौडही थांबवली. कोपा अमेरिका स्पर्धेची अंतिम फेरी चांगलीच रंगल्याचे पहायला मिळाले.

अर्जेंटिनाच्या खेळाडूंचा या सामन्यावर वर्चस्व राखण्याचा प्रयत्न होता. मात्र कोलंबियाचे खेळाडूही तोडीस तोड टक्कर देत होते. खेळ सुरू असताना ६४ व्या मिनिटाला अर्जेंटिनाचा कर्णधार आणि महान फुटबॉलपटू लिओनल मेस्सी दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर पडला. आता अर्जेंटिनाला विजेतेपद मिळवून देण्याचे स्वप्न अपूर्ण राहते की काय, असे वाटून त्याच्या डोळ्यात पाणी आले. मात्र सहकाऱ्यांनी मेस्सीचा विश्वास ढळू दिला नाही. मेस्सी बाहेर पडल्यानंतर सामन्यावर वर्चस्व गाजवता येईल, असे कोलंबियाला वाटले होतते. मात्र तसे घडू शकले नाही आणि अर्जेंटिनाने हा सामना १-० ने जिंकत इतिहास घडवला. या विजयामुळे मेस्सीबाबत 'अश्रूंची झाली फुले' असे म्हणता येईल. या विजयानंतर तो खूपच आनंदी दिसत होता. त्याच्या डोळ्यातल्या अश्रूंची जागा चेहऱ्यावरच्या हास्याने घेतली होती. अर्जेंटिनावासीयांचे स्वप्न साकारल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर विलसत होते. अवघ्या चार वर्षांमध्ये अर्जेंटिनाने दोन कोपा अमेरिका आणि एक फिफा विश्वचषक अशी तीन मोठी विजेतेपदे पटकावल्याने अर्जेंटिनाचे चाहतेही आनंदाने बेभान होऊन नाचत होते. प्रेक्षकांनी घातलेल्या गोंधळामुळे हा सामना तब्बल नव्वद मिनिटे उशीराने सुरू झाला. मात्र यापैकी कशाचाही परिणाम अर्जेंटिनावर झाला नाही. ते विजयासाठीच मैदानात उतरले होते. ते विजेत्यांप्रमाणेच खेळले आणि जिंकले.

तिकडे जगाच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे युरोपमध्ये युरो चषकाच्या अंतिम सामन्यात स्पेन आणि इंग्लंडच्या संघात कांटे की टक्कर पहायाला मिळाली आणि अखेर स्पेनने २-१ अशी बाजी मारली. यामुळे इंग्लंडचे विजयाचे स्वप्न अर्थातच अपूर्ण राहिले. स्पेनने चौथ्यांदा युरो चषक स्पर्धेवर नाव कोरले. या विजयानंतर स्पेनचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. स्पेनने संपूर्ण स्पर्धेत सरस खेळ केला. या संघाने स्पर्धेतले सलग सात सामने पेनल्टी शूटआउटशिवाय जिंकले. या स्पर्धेच्या इतिहासातला हा एक विक्रम ठरला. युरो २०२४ च्या प्रवासात स्पेनने इटली, जर्मनी, फ्रान्स आणि इंग्लंड या सर्व गतविश्वविजेत्यांना पराभूत केले. तसेच २०१८ च्या फुटबॉल विश्वचषकाचे उपविजेतेपद मिळवणाऱ्या क्रोएशियाचाही पराभव केला. ही स्पर्धा सुरू होताना स्पेन विजेतेपदाचे अगदीच प्रबळ दावेदार नव्हते. मात्र या संघाने प्रत्येक सामन्यागणिक खेळ उंचावला आणि सरतेशेवटी विजेतेपदावर नावही कोरले. या स्पर्धेत स्पेनच्या लॅमिन यमाल या युवा खेळाडूची चांगलीच चर्चा झाली. अवघ्या १७ वर्षांच्या या खेळाडूने यंदाची युरो स्पर्धा गाजवली. युरो चषक स्पर्धेत गोल करणारा तो आजवरचा सर्वात युवा खेळाडू ठरला. युरो चषकाच्या अंतिम सामन्याच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ जुलैला त्याने आपला सतरावा वाढदिवस साजरा केला आणि दुसऱ्याच दिवशी त्याला अविस्मरणीय अशी विजयी भेटही मिळाली. यमालला स्पर्धेतल्या सर्वोत्तम युवा खेळाडूचं बक्षिस मिळाले. या विजयामुळे स्पेनचा आत्मविश्वास दुणावला तर दुसरीकडे इंग्लंडचे खेळाडू पराभवामुळे निराश झाले. या स्पर्धेतला स्पेनचा खेळ पाहता या विजयावर स्पेनचाच हक्क असल्याचे जाणकारांनी म्हटले.

युरो चषकाच्या विजयासोबतच टेनिस विश्वातूनही स्पेनसाठी आनंदाची बातमी आली. विम्बल्डन पुरुष एकेरी स्पर्धेत त्या देशाच्या कार्लोस अल्कराझने नोवाक जोकोविकवर मात करत सलग दुसऱ्यांदा स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. गेल्या वर्षीही या दोन खेळाडूंमध्येच अंतिम सामना रंगला होता. या सामन्यात अल्कराझला विजयासाठी पाच सेटपर्यंत झुंझावे लागले होते. याच सामन्याचा ॲक्शन रिप्ले पहायला मिळेल, अशी चाहत्यांची अपेक्षा होती. मात्र अवघ्या २१ वर्षांच्या अल्काराझने आपल्या जबरदस्त खेळाने जोकोविचसारख्या मुरलेल्या टेनिसपटूच्या नाकी नऊ आणले. अल्कराझची भेदक सर्व्हिस आणि त्याने मारलेल्या परतीच्या फटक्यांना जोकोविककडे उत्तर नसल्याचे पहायला मिळाले. अल्कराझने सलग तीन सेटमध्ये हा सामना संपवला. जोकोविच गुडघ्याच्या शस्त्रक्रियेतून सावरून या स्पर्धेत उतरला होता. त्यामुळे त्याच्या हालचालींवर मर्यादा आल्या होत्या. मात्र असे असूनही त्याने अंतिम फेरी गाठली. यातूनच जोकोविचच्या महानतेची प्रचिती येते. अल्कराझने वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी चार ग्रॅंडस्लॅम विजेतेपदे पटकावली आहेत. इतकेच नव्हे तर, एकाच वर्षात फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन जिंकणारा तो सहावा खेळाडू ठरला. वयाची २२ वर्षं पूर्ण व्हायच्या आत दोन विम्बल्डन किताब जिंकण्याच्या बाबतीत त्याने बियॉन बोर्ग आणि बोरिस बेकरच्या कामगिरीशी बरोबरी केली. त्यामुळे येत्या काळात टेनिसविश्वात कार्लोस अल्कराझ हे नाव गाजल्यास आश्चर्य वाटायला नको.

दरम्यान, आदल्या दिवशी विम्बल्डन महिला एकेरीच्या चुरशीच्या लढतीत झेक प्रजासत्ताकच्या बार्बरा क्रेजिकोवाने इटलीच्या जॅस्मिन पाओलिनीवर मात करत विजेतेपद पटकावले. हे तिचे दुसरे ग्रॅंडस्लॅम तर पहिलेच विम्बल्डन विजेतेपद ठरले. दरम्यान, पुरुष एकेरीमध्ये ठराविक खेळाडूंचे वर्चस्व असले तरी विम्बल्डन महिला एकेरीने गेल्या आठ वर्षांमध्ये दर वर्षी नवी विजेती दिली आहे. क्रेजिकोवा ही गेल्या आठ वर्षांमधली विम्बल्डनची आठवी विजेती. या काळात कोणत्याही महिला खेळाडूने विम्बल्डन सलग जिंकण्याचा पराक्रम केलेला नाही. त्यामुळे महिला टेनिसमध्ये सध्या तरी कोणत्याही एका खेळाडूचे वर्चस्व दिसत नाही. भारताच्या युवा संघाने झिम्बाब्वे दौऱ्यात पाच टी-२० सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकली. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाने पहिल्या सामन्यातील अनपेक्षित पराभवानंतर चांगलीच मुसंडी मारली आणि झिम्बाब्वेला चारी मुंड्या चीत केले. टी-२० विश्वचषकानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांनी या प्रकारातून निवृत्ती घेतल्यानंतर आता या युवा शिलेदारांवरच टीम इंडियाची भिस्त असेल.

युरो चषक, कोपा अमेरिका, विम्बल्डन या महत्त्वाच्या स्पर्धा संपल्या. क्रीडारसिकांनी या स्पर्धांचा पुरेपूर आनंद लुटला. त्यानंतर आता सर्वांनाच ऑलिम्पिकचे वेध लागले आहेत. यंदा ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंची कामगिरी कशी होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**आजकाल**

# श्रीकृष्ण इनामदार ज्येष्ठ विधिज्ञ, जाणते साहित्यरसिक

**अरूण म्हात्रे**

काल (१८ जुलै २०२४) मराठीतील प्रयोगशील संगीतकार आणि मराठी अभिमान गीताचा कर्ता कौशल इनामदार याचे वडील - ज्येष्ठ विधिज्ञ, अनेक सांस्कृतिक संस्थांचे विश्वस्त आणि एक जाणते साहित्य रसिक आदरणीय श्रीकृष्ण इनामदार यांचे देहावसान झाले. गेले काही महिने ते आजारी होते. ते गेल्याची बातमी कळली आणि गेली पंधरा वीस वर्षे कौशलबरोबर माझा कवितेचा आणि संगीताचा प्रवास डोळ्यासमोरून सरकला.

कौशलच्या प्रयोगशील चालींची माझ्या मनावर नक्कीच मोहिनी होती आणि आहे. त्यात मी ''अमृताचा वसा'' ह्या कौशलने स्वरबद्ध केलेल्या कवितेच्या कार्यक्रमाचा निवेदक होतो. त्यामुळे सुरवातीला कार्यक्रमाच्या तयारी दरम्यान त्याच्या माझ्या त्याच्या घरच्या भेटी अगदी अपरिहार्य होत्या. पण त्या सर्व भेटींमध्ये एक अधिकचे आकर्षण आणि एक सुप्त निमंत्रण असायचे ते कौशलच्या वडिलांचे - श्रीकृष्ण इनामदार यांचे. स्वतः उत्तम कवी असलेले इनामदार हे कवितेचे तर रसिक होते पण त्याहून ते अत्यंत साक्षेपी असे मर्मज्ञ होते. कवितेच्या एखाद्या चालीविषयी किंवा कवितेविषयी ते मोजके बोलत. पण ते इतके नेमके असे ही एखाद्या कवितेतले मर्म काय आहे हे जणु त्यांनी चिंतन करून शोधून काढले असावे असेच वाटे. ते बोलायचे तेव्हा कळायचे की आपण फारच वस्तूनिष्ठ पद्धतीने किंवा पूर्ण भावनिक होऊन कवितेकडे पाहतोय. एक उत्तम नामांकित विधिज्ञ असलेले इनामदार हे साहित्याचे उत्तम वाचक होते आणि महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या अनेक राजकीय सामाजिक सांस्कृतिक घटनांचे डोळस साक्षीदार होते. पुण्यात शिक्षण आणि आपल्या व्यावसायिक कारकीर्दीला सुरवात केलेले इनामदार अनेक मोठ्या कार्पोरेट हाऊसेसचे कायदा सल्लागार होते. काही लोकांचे कर्तृत्व पडद्याआड राहते आणि ती माणसे संपर्कात आल्याशिवाय त्यांचे श्रेष्ठत्व माहीत होत नाही. कौशलच्या निमित्ताने कौशलचे आई बाबा मला भेटले ही माझ्यासाठी मला श्रीमंत करणारी गोष्ट वाटते.



तर ह्या श्रीकृष्ण इनामदारांच्या आशिलांची नावे जरी सांगितली तरी त्यांचे भव्यपण लक्षात येईल. किर्लोस्कर कंपनीचे किर्लोस्कर कुटुंबिय, राष्ट्रीय नेते शरद पवार, ज्येष्ठ गायिका आशा भोसले, निर्माता दिग्दर्शक दादा कोंडके आणि आध्यात्मिक गुरु आचार्य ओशो.. आचार्य ओशोच्या केस मध्ये त्यांनी ओशोची बाजू कोर्टात इतकी अभ्यासपूर्ण मांडली होती की ओशोचे शिष्यगणही इनामदारांचा आध्यात्माचा व्यासंग पाहून अवाक झाले होते आणि खुद्द आचार्यजींनी त्यांना अमेरिकेतील भेटी दरम्यान एअरपोर्ट वर इनामदारांची भेट घेतली होती. दादा कोंडके यांच्यावर झालेल्या अश्लीलतेच्या आरोपातून त्यांची सुटका करणारे वकील श्रीकृष्ण इनामदारच होते. माझा त्यांचा संबंध कवितेच्या निमित्तानेच असायचा. पण निवेदनात भर कशावर हवा ह्याची समज त्यांच्या साध्या साध्या सूचनातून मला होई. कौशलच्या चालींमुळे जसे मला कवितेचा आशय खुला होई तसें इनामदारांच्या बोलण्यातून मला कवितेचे केंद्र कुठल्या ओळीत आहे ते कळे. मला आठवतेय, कौशलच्या घरी कविवर्य शंकर वैद्य आणि पंडित सत्यशील देशपांडे असे दिग्गज गप्पा मारण्यासाठी जमले की काव्य शास्त्र विनोदाची ती मोठी पर्वणी असे. इनामदार, वैद्यसर आणि सत्यशील असे त्रिकुट बोलू लागले की अनेक संदिग्ध अस्पष्ट अशा गोष्टीवर प्रकाश पडे, कैक विचारव्युहांचा खल होई. आणि कवितेखेरीज अनेक गोष्टींचा उलगडा होई.

माझ्या निवेदनाला इनामदार सरांची दाद ही माझ्यासाठी शेवटची दाद असे. त्यांनी कौतुक केले की मला कार्यक्रमाचे श्रेय मिळाल्यागत वाटे. मी कवितेच्या कार्यक्रमात इतर कविंच्या कविता-अगदी नव्या जुन्या कवींच्या - सादर करतो याचे कारण इनामदारानीच मला मी माझ्या समकालीन कविंच्या कविता त्यांच्याहून अधिक प्रभावी पद्धतीने सादर करतो असे सर्टिफिकेट एकदा एका मैफिलीत दिले होते. ''अमृताचा वसा'' हा कार्यक्रम माझ्यासाठी कवितेचा माझ्या मनातील पैस वाढविण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा कार्यक्रम वाटतो कारण एकीकडे ताज्या दमाचे सर्व नवे गायक वादक कलाकार तर दुसरीकडे दाद देण्यासाठी कौशलचे जाणते आईबाबा निगुतीने सारे ग्रहण करीत बसलेले असत.

श्रीकृष्ण इनामदार गेले आणि माझ्या आयुष्यातील मार्गदर्शक, प्रोत्साहक आणि उच्च दर्जाच्या आदरणीय आणि आदर्श अशा एका ज्येष्ठाचे नाव काळाच्या पडद्याआड गेल्यासारखे झाले. ईश्वर, त्यांच्या आत्म्याला सद्गती शांती देवो. इनामदारांच्या विचक्षण व्यक्तिमत्वाला माझे विनम्र अभिवादन. **(फेसबुकवरून साभार)**

**लोकसंसद**

### पाकिस्तानात महागाईने गाठला कळस

पाकिस्तानमध्ये जीवनावश्यक वस्तूंची अत्यंत टंचाई निर्माण झाली असून अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. एका बातमीनुसार पीठ ८०० रुपये किलो तर तेल ९०० रुपये किलो एवढ्या चढ्या भावाने विकले जात आहे. अनेक मध्यम वर्गीय लोकांना अत्यंत अडचणींना सामना करावा लागत आहे. तेथील रुपया सुद्धा जागतिक विनिमयात कोसळला आहे आरोग्य सुविधा, शिक्षण इत्यादी साठी पैसे कसे उभे करावेत या चिंतेत पाकिस्तानातील जनता आहे ही बातमी नुकतीच वाचली. ही महागाई सतत वाढत असताना राज्यकर्ते मात्र परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास समर्थ दिसत नाहीत. संरक्षण खर्चात मात्र १५ टक्क्यांनी वाढ केली आहे. जाणकारांच्या मते पाकिस्तानात अर्थव्यवस्थेचा विकास दर २.३८ टक्के एवढाच टप्पा गाठू शकतो. येत्या काही काळात तब्बल ९७०० अब्ज रुपयांच्या कर्जाची परत फेड करावी लागणार आहे. हे सर्व आकडे सध्या तरी आव्हानात्मक आहेत यात शंका नाही. यावर चीन आपली नजर ठेवून आहे. पाकिस्तान आपल्या जाळ्यात कसा येईल याचे मनसुबे चीन आखत आहे शेवटी असहाय्य स्थितीत सापडलेल्या पाकिस्तानला चीनला सामोरे जावेच लागेल

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२२ जुलै**

**१८८२:-** मराठी भाषा आणि मोडी लिपी आत्मसात करुन मराठीत लेखन करणारे इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांचा जन्म. **१८८३:-** संतसाहित्यिक, अध्यात्म व तत्वज्ञान या विषयावरील लेखक मंगेश रामचंद्र टाकी यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत, 'श्रीकृष्णाचे सद्गुरु श्री दुर्वास','श्री तुकाराम महाराजांचे संदेह वैकुंठागमन', 'समाधीचे विविध प्रकार','आचार्य चतुष्ट्य', 'प्रारब्ध कर्माचे सांगोपांग विवेचन' आदी ग्रंथाचा समावेश आहे. **१९०८:-** इंग्रजी वाङ्मयातील आधुनिकतेच्या परंपरेचा वेध घेणारे अनुवादक आणि लेखक भालचंद्र महेश्वर गोरे यांचा जन्म. 'लघुत्तमकथा' हा प्रकार अधिक रुजवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. 'आधुनिक आंग्लवाङ्मय' हे पुस्तक त्यांनी लिहिले, ॲम्ब्रोज बिअर्सच्या लघुकथांचा अनुवाद केला. थॉमस हार्डीच्या कादंबरीचा 'गर्दीपासून दूर', 'मनोऱ्यावर' हा अनुवाद. तसेच होमरचे 'इलियड' व शेक्सपिअरच्या नाटकांचा परिचय करुन देणारी पुस्तकेही त्यांनी लिहिली, याखेरीज अनेक स्वतंत्र लघुकथा, लघुकथा व बालवाङ्मयही त्यांनी लिहिले होते. **१९२५:-** लेखक, पत्रकार, संपादक गोविंद श्रीपाद तळवलकर यांचा जन्म. 'नौरोजी ते नेहरु','सत्तांतर (दोन खंड)','बाळ गंगाधर टिळक आणि विराट ज्ञानी (न्या. म.गो.रानडे)', 'सोविएट साम्राज्याचा उदय आणि अस्त (तीन खंड)' आदी पुस्तके त्यांनी लिहिली. तसेच त्यांच्या सडेतोड, विश्लेषक अग्रलेखांचे 'अग्रलेख' हे संकलन आणि 'वाचस्पती' या टोपणनावाने त्यांनी केलेल्या ग्रंथविषयक लिखाणाचे 'वाचता वाचता' प्रसिध्द आहे. तळवलकर-लिखित मृत्युलेखांचेही 'पुष्पांजली' हे पुस्तक झाले आहे. **१९२६:-** लेखिका, बालसाहित्यिका तारा रामचंद्र कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांच्या बालसाहित्यात 'झिमकोच्या गुहेत मधुराणी', 'झुंजुमुंजु' हे काव्य, 'मर्दानी तुळसा' हा कथासंग्रह, 'राजस राजकुमार' ही बाल कादंबरी अशी साहित्य संपदा. **१९३०:-** गणितज्ञ आणि या विषयांतील एक लेखक डॉ. श्रीराम शंकर अभ्यंकर यांचा जन्म. **१९३१:-** कथा-कादंबरीकार शकुंतला विष्णू गोगटे यांचा जन्म. कवितेपासून लेखनाला सुरुवात करणाऱ्या शकुंतलाबाईंची कथा, कादंबऱ्यांची संख्या साठहून आधिक आहे. त्यामध्ये 'शून्याची व्यथा', 'चंदनाची उटी', 'चांदणे शिंपीत जा', 'जगा वेगळे नाते', 'अनुबंध' ह्या कादंबऱ्या तसेच 'सावलीचा चटका', 'बोलक्या भिंती', 'मर्मबंध', 'चोरकप्पा' आदी कथासंग्रह प्रकाशित झाले. **१९३७ :-** लेखक, संतसाहित्य आणि संगीत या विषयाचे व्यासंगी प्रा. रघुवीर रामचंद्र गोसावी यांचा जन्म. यांनी 'कोल्हापूरची महालक्ष्मी', 'जेजुरीचा खंडोबा', 'तुळजापुरची भवानी', 'पाच उपासना ग्रंथ', 'पाच भक्तीसंप्रदाय', 'मराठीचे ऐतिहासिक भाषा शास्त्र', 'श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय' आणि 'साईबाबांच्या चरित्रा'सह संत चरित्रे संच १,२ अशी ग्रंथरचना केली. **१९४१:-** लेखिका डॉ. सौ. पद्मा कुलकर्णी यांचा जन्म. 'अभिनव गाणी भाग १, २' या पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. **१९४५:-** कवी सुनीता नरहर औताडे यांचा जन्म. वयाच्या ४० व्या वर्षी काव्यलेखनाला सुरुवात. 'भावसुधा', 'पाऊलखुणा', 'रंगतरंग' हे काव्यसंग्रह प्रकाशित. तसेच काही लेख, बालगीतसंग्रह, सुविचारसंग्रह, लावणीसंग्रह, ओव्या म्हणी अशा स्वरुपाचे लेखन त्यांनी केले आहे. **१९६०:-** लेखक संजय बाबुलाल नाईक यांचा जन्म. पेशाने मेटलर्जीकर इंजिनिअर. ह्यांच्या २५० हून अधिक कथा, विविध नियतकालिके आणि दिवाळी अंकातून प्रकाशित. या शिवाय १९ एकांकिका, ४ नाटके, ८५ विविध विषयांवरील कादंबऱ्या, १२ रोटरी विषयक पुस्तके, ७ कथासंग्रह, २० व्यक्तिभाव विकास मानसशास्त्र, शिक्षणसाास्त्र या विषयावरील पुस्तके आणि एक चित्रपट लेखन अशी विपूल साहित्य संपदा. **१९६६:-** लेखक सीमंतिनी राजेंद्र खेर यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'सुभाषित कथा' रामायण, महाभारत, योगवसिष्ठ, भागवत यातील सुभाषित कथा, 'वाहन ते यान' मधून चाकापासून यानापर्यंत वाहनांची उत्क्रांती याविषयाची माहिती तर 'पहिले पाऊल' यातून मानवाचे चंद्रावर, हिमालयात, सागरगर्भात टाकलेले पहिले पाऊल. हे माहितीपूर्ण पुस्तक आणि दैनंदिन भगवद्गीता यांत ३६५ दिवसांत गीतेचा अभ्यास, वाचन, चिंतन, मनन करण्यासाठीचा ग्रंथ. **१९८४:-** लेखक प्रकाशक ग. ल. ठोकळ यांचे निधन. 'लेखन वाचन भांडार' नावाचे पुस्तकांचे दुकान सुरु करुन ग्रंथविक्री व प्रकाशन व्यवसायात रमणाऱ्या ठोकळांनी 'गावगुंड', 'टेंभा', 'ठिणगी' या कादंबऱ्या लिहिल्या. 'मीठभाकर' हा काव्यसंग्रह आणि 'सुगी' हा ज्ञानपद गीतांचा संग्रह त्यांनी संपादित केला. तसेच काही कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. **२००१:-** कथा, कादंबरीकार, नाटककार पद्माकर गोवईकर यांचे निधन. अभिनेते असणाऱ्या गोवईकरांच्या नावावर सुमारे पंचवीस एक पुस्तके आहेत. संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडावर लिहिलेली 'मुंगी उडाली आकाशी' ही त्यांची कादंबरी गाजली. याशिवाय 'गोफ', 'नायगारा', 'देवगंधार, हे गंभीर विषयांवर तर 'पोपटपंची','शहाण्यांची शाळा' असे विनोदी. 'सांजवाणी' सारखा ग्रामीण कथासंग्रह तसेच 'सांगू नये ते', 'वय वेडं असतं', 'वणवा' या सारख्या प्रणयप्रधान कादंबऱ्या आणि 'प्रेषितांचे पाय मातीचे', 'रातराणी', 'देह देवाचे मंदिर' अशी नाटके इ. साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **२०१३:-** 'चार शब्द' या दिवाळी अंकाचे संपादक, चित्रकार अरुण मानकर यांचे निधन. **२०१३:-** पुराभिलेख आणि नाणकशास्त्र या विषयांत संशोधन आणि लेखन तज्ज्ञ लेखिका डॉ. शोभना गोखले यांचे निधन. शिलालेखांचा शोध घेत दुर्मिळ माहिती त्यांनी गोळा केली. कान्हेरी येथील २६ शिलालेख त्यांनी शोधून काढले. त्याचे आतापर्यंत १५० शोधनिबंध आणि पुराभिलेख विद्या, भारतीय संस्कृतीवैभव यासह १० पुस्तके प्रकाशित झाली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील लेखांचे पुनर्वसन करत असताना त्यांनी नवा सिध्दांत मांडला. एकंदरीत इतिहास विषयाच्या अभ्यासाला त्यांनी नवी दिशा दिली. ब्रुसेलस येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय नाणक परिषदेच्या त्या अध्यक्षा होत्या. असा बहुमान मिळवणाऱ्या त्या पहिल्याच भारतीय संशोधक.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. संदीप अनंत पाठारे, स्मरणार्थ अलिबाग**


# नेरळ ग्रामपंचायत बरखास्तीचे दिशेने

## राजीनामा देणाऱ्या १५ सदस्यांच्या सह्यांची होणार पडताळणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत मुदतीआधी बरखास्त होण्याच्या मार्गावर आहे. या ग्रामपंचायतीमधील सरपंच वगळता अन्य सर्व सदस्यांनी राजीनामे दिले आहेत. त्यामुळे संख्याबळ राहणार नाही आणि ५० टक्के संख्याबळ नसल्याने कदाचित ग्रामपंचायत बरखास्त होऊ शकते. दरम्यान, १८ जुलै रोजी राजीनामे देणाऱ्या सर्व १५ सदस्यांच्या राजीनामा पत्रावरील सह्यांची पडताळणी केली जाणार असून, या महिन्याच्या अखेरीस नेरळ ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकीय राजवट की सरपंच उषा पारधी यांचे पदे कायम हे नक्की होणार आहे.**

थेट सरपंच रावजी शिंगवा यांच्या अकाली मृत्यूनंतर जुलै २०२१ मध्ये प्रभाग एकमधून




निवडून गेलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव सरपंचपदावर विराजमान झाल्या होत्या. त्यावेळी त्यांना शिवसेना एक गट, भाजप, शेकाप या सदस्यांचे पाठबळ होते. प्रभाग एकमधून शेकापचे पॅनल मधून उषा कृष्णा पारधी या निवडून आल्या होत्या आणि त्यानंतर त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला होता. सरपंचपदाची साधारण दोन वर्षाची कारकीर्द पूर्ण झाली असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी नाहीतर सत्ताधारी पक्षाच्या नऊ सदस्यांनी सरपंच पारधी यांच्या कारभाराविरुद्ध दंड थोपटले होते.

ग्रामपंचायत अधिनियमनुसार ५० टक्क्यांपेक्षा कमी संख्याबळ असेल तर ते सदस्य मंडळ बरखास्त होते. नेरळ ग्रामपंचायतीमध्ये सध्या १६ सदस्य असून, त्यातील सत्ताधारी नऊ सदस्यांनी राजीनामे दिल्याने आणि ते राजीनामे विशेष सभेत मंजूर झाल्यास नेरळ ग्रामपंचायत आपोआप बरखास्त होणार होती. मात्र, तरीदेखील विरोधी पक्षाचे सदस्यांनी राजीनामे दिले आहेत आणि त्यामुळे जनतेने कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. सरपंच उषा पारधी या आपल्या सहकारी सदस्यांचे ऐकत नाहीत हे बोलले जात आहे. त्यावेळी त्यांच्याकडून जनतादेखील सहकाऱ्यांची अपेक्षा कशी करणार? अशावेळी विरोधी सदयस हे ग्रामस्थ यांच्यासाठी हक्काचे असतात. पण, सरपंच मनमानी करतात म्हणून सत्ताधारी सदस्य राजीनामा देतात आणि सत्ताधारी सदस्यांनी राजीनामे दिले म्हणून विरोधी पक्षाचे सदस्यदेखील राजीनामे देतात, हे पहिल्यांदा घडले आहे.

### विशेष सभेत होणार निर्णय

**ग्रामपंचायत मधील सत्ताधारी नऊ आणि विरोधी सहा अशा सर्व मिळून १५ सदस्यांनी राजीनामे दिले आहेत.त्या सर्व राजीनामे पत्रावरील सह्यांची पडताळणी करण्यासाठी विशेष सभा आठ दिवसात अपेक्षित आहे. विशेष सभेचा अजेंडा हा किमान चार दिवस आधी सदस्यांच्या घरी पोहोचला पाहिजे. विशेष सभेला राजीनामा देणाऱ्या सदस्यांपैकी काही सदस्यांनी आपली सही चुकीची आहे, आपल्याला धमकावून सही घेतली आहे असे आक्षेप नोंदवल्यास त्या सदस्यांचे राजीनामे पत्र बाद होते. त्यामुळे १८ जुलै रोजी झालेले राजीनामा सत्र विशेष सभेनंतर खऱ्या निर्णयाकडे जाणार आहे. राजीनामे विशेष सभेत मंजूर झाल्यास नेरळ ग्रामपंचायत बरखास्त होणार आहे.**

# बॅंक ऑफ इंडियातर्फे किसान दिवस

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

बॅंक ऑफ इंडियातर्फे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी १९ जुलै हा दिवस किसान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विभागीय प्रमुख मुकेश कुमार, उपविभागीय प्रमुख बिरेन चॅटर्जी यांनी पेण येथे तसेच जिल्हा अग्रणी बॅंक प्रबंधक विजय कुलकर्णी यांनी माणगाव येथे किसान दिवस साजरा केला.

बॅंक ऑफ इंडिया नेहमीच समाजाच्या शेवटच्या सर्व घटकापर्यंत सेवा देण्यास कटिबध्द आहे. सर्व ग्राहकांनी बॅंकेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय प्रमुख मुकेश कुमार यांनी केले. यावेळी शेतकरी, महिला बचत गट, उमेद कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी किसान क्रेडिट कार्ड, बचत गट कर्ज, कृषी वाहन, सुवर्ण कर्ज आदी कर्जांचे वाटप सर्व शाखांमधून करण्यात आले. यादिवशी बॅंक ऑफ इंडियातर्फे संपूर्ण जिल्ह्यात कृषी संबंधित योजनांमध्ये १० कोटी कर्ज वाटप करण्यात आले, अशी माहिती कृषी विभाग प्रमुख सुधीर गायकवाड यांनी दिली.

# सराफाकडून कोट्यवधींची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

शहरातील एका सराफाने १७ गुंतवणूकदारांची तब्बल साडेसहा कोटी रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याबाबत तक्रारदारांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तांकडे अर्ज केल्यावर या गुन्ह्याला वाचा फुटली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल शहरातील कापड गल्ली येथील डी.एम. कोठारी ज्वेलर्स या सराफाच्या दुकानामध्ये सप्टेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२३ यादरम्यान सोने खरेदी-विक्रीच्या व्यवहारामध्ये गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी दर महिन्याला अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष देण्यात आले. रोख रकमेतून आणि बॅंक खात्यातून गुंतवणूकदारांनी तब्बल ६ कोटी ५७ लाख ३६ हजारांची गुंतवणूक केली. काही महिन्यांनी गुंतवणूकदारांनी नफ्याची मागणी केल्यावर त्यांना मुद्दलसुद्धा परत न दिल्याने गुंतवणूकदारांनी पोलिसांत धाव घेतली. याबाबत सराफ मित्तल कोठारी, दिलीप कोठारी, लता कोठारी, प्रीती कोठारी यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# रोह्यात विनानंबर प्लेटच्या दुचाकींचा सर्रास वावर

- **वाहन कायद्याला दुचाकीस्वारांकडून बसवले जातेय धाब्यावर**
- **वाहतूक पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

**। धाटाव । वार्ताहर ।**

सबंध रोहा तालुक्यात आणि शहरातही नंबर प्लेट नसणाऱ्या दुचाकी वाहनांचा चांगलाच सुळसुळाट वाढला आहे. ग्रामीण भागासह शहर परिसरात नंबर प्लेट नसणाऱ्या दुचाकी वाहनांबद्दल संशय व्यक्त केला जात असताना रोह्यात वाहतूक पोलिसांनी नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे का? याबद्दल संशय व्यक्त होताना दिसत आहे.

सार्वजनिकठिकाणीतररस्त्यावर दुचाकी वाहनांना नंबर प्लेट नसताना दुचाकींचा सर्रास वापर कशासाठी केला जातो? याचीही सध्या चर्चा रंगू लागली आहे. तर राजरोसपणे ही वाहनं फिरत असल्याने वाहन कायद्याला दुचाकीस्वारांनी मात्र तिलांजली दिली असल्याचेही समोर आले आहे. मात्र, वाहतूक पोलीस प्रशासन या गंभीर बाबींकडे जाणीवपूर्वक लक्ष देतील का, असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.



रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था सक्षम आणि सुरळीतपणे होण्यासाठी परिवहन विभाग प्रत्येक स्वयंचलित दुचाकी व चारचाकी वाहनांना विशिष्ट नंबर देत असतात, परंतु अलीकडे जिल्ह्यात विनानंबरच्या नवीन गाड्यांसोबतच विनानंबरची अनेक जुनी वाहनेही रस्त्यावरून धावताना दिसत आहे. वाहनचालकांचा वेग एवढा अमर्यादित असतो, त्यातही भरीस भर म्हणजे रस्त्यावरून धावणाऱ्या अनेक वाहनांवर नंबर प्लेटच दिसून येत नाही, तर अनेक वाहने त्रोटक नंबरची तर काही वाहनांच्या नंबर प्लेट अर्धवट आकड्यांमध्ये पहावयास मिळतात. अशा विनानंबरच्या वाहनांकडून काही अप्रिय घटना घडल्यास ते वाहन कसे लक्षात ठेवायचे, अशी परिस्थिती सध्या तरी आहे.

### नागरिकांकडून कारवाईची मागणी

**काहीच कामे नसताना केवळ शाळा, कॉलेजजवळ घिरट्या घालणाऱ्या दुचाकीस्वारांची संख्या सध्या वाढली आहे. पण हल्ली दुचाकी वाहनांचे नंबर गायब झाल्याचे व त्याजागी 'अण्णा', 'दादा', 'हिंदू', 'बेडर' अशी नावे लिहिलेल्या नंबर प्लेट लावलेल्या दिसतात. अनेक दुचाकी नंबरविनाच वापरण्यात येत आहेत. तरुण व अल्पवयीन मुले या दुचाकी वाहनांचा सर्रासपणे वापर करत आहेत. यामुळे एखादा अपघात झाल्यास नंबर नसल्याने त्याची चौकशी करणे पोलीस खात्यास जिकिरीचे ठरू शकते.**

# ग्रामसेवकपदी वैभव पाटील

**। रसायनी । वार्ताहर ।**

वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी म्हणून वैभव बाळकृष्ण पाटील यांनी शुक्रवार, दि.१९ जुलैपासून कार्यभार स्वीकारला. वैभव पाटील



यांनी याअगोदर १९ वर्षे सेवा बजावली असून, याअगोदर नंदन पाडा ग्रामपंचायतीचे काम पाहिले आहे. त्यांनी त्यांच्या सेवेत घारापुरी, पागोटे, वशेनी व नंदनपाडा या ग्रामपंचायतींचा कारभार सांभाळला आहे. त्यांना जिल्हा परिषदेचा आदर्श ग्रामसेवक पुरस्कार, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

# अंबा नदीच्या पुलाची डागडुजी

**। पाली । वार्ताहर ।**

खुरावले फाटा ते वाघोशी मार्गावर भेरव येथील अंबा नदीवरील पुलावर पडलेले महाकाय खड्डे अखेर भरण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते व वाघोशी ग्रामपंचायतीचे मा. उपसरपंच दिपक पवार यांच्या प्रयत्नांतून व वसुधा सोसायटीच्या सहकार्यातून हे महाकाय खड्डे भरण्यात आले आहेत.

अंबा नदीच्या पुलाच्या दोन्ही बाजूस रस्त्याला मोठं मोठे पडले होते. वाहनचालकांना वाहने चालविताना अडचणी येत होत्या. तसेच पुलावरदेखील खड्डे असल्याने रस्ता अरुंद झाला होता. त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत होती. तसेच पुलावरील खड्ड्यांतून लोखंडी सळ्या निघाल्या असल्याने वाहनांच्या टायरमध्ये घुसून टायर फुटण्याचा धोका निर्माण झाला होता. या सर्व अडचणी लक्षात घेत दिपक पवार



यांनी याबाबत वसुधा सोसायटीच्या व्यवस्थापनासोबत चर्चा करुन ते खड्डे भरण्याची मागणी केली. या मागणीला वसुधा सोसायटीकडून हिरवा कंदील दाखवित खड्डे भरण्यासाठी लागणारे मटेरियल व खड्डे भरण्यासाठी कर्मचारी देण्याची तयारी दर्शविली.

या रस्त्याचे काम काही वर्षांपूर्वीच पूर्ण झाले आहे. मात्र, ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या रस्त्यावर कालांतराने लगेच खड्डे पडण्यास सुरुवात झाली. रस्त्याचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी शिल्लक असूनदेखील ठेकेदार याकडे ढुंकूनही बघत नाही. ऐन पावसाळ्यात नागरिकांना या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. मात्र, तरीदेखील ठेकेदार व प्रशासनाचे संबंधित अधिकारी या खड्डेमय परिस्थितीकडे बघायला तयार नाहीत, असा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी, स्थानिक व खासगी व्यस्थापनाच्या सहकार्यातून रस्त्यावरील खड्डे भरले जात आहेत. अंबा नदीवरील खड्डे भरल्याने वाहनचालकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

वरदायिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. पत्रकार जितेंद्र जाधव यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला. या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागावचे माजी विद्यार्थी जितेंद्र जाधव यांनी सहयोगी माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या कार्यक्रमाला महुरे येथील जयवंत जाधव, पत्रकार राजेंद्र जाधव, रवींद्र कान्हेकर, उध्दव आव्हाड, पोलीस संघटनेचे माजी पदाधिकारी कमलाकर मांगले, मुख्याध्यापक तुकाराम व्यवहारे व शिक्षक उपस्थित होते. ज्या गावात आपले बालपण गेले, ज्या शाळेत शिकतो, त्या शाळेला कधीच विसरता कामा नयेत. अधिक दुर्गम भागातील विद्यालये विविध अडचणीत असतात. सामान्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, पाठबळाची गरज असते. ती गरज, सामाजिक बांधिलकी माजी विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे, असे आवाहन जितेंद्र जाधव यांनी केले.

# गोखले शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

येथील गोखले एज्युकेशन संस्थेच्या, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार, दि. २० जुलै रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी व एचएससी बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांकाने गुणानुक्रम मिळवुन प्रथम आल्याबद्दल विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी व उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

दरम्यान, कॉलेज कॅम्पसमधील न्यू मॉर्डन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये एसएससी बोर्ड परीक्षेत प्रथम आल्याबद्दल मनस्वी मनोज भुसाने, श्रीवर्धन हिचाही प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या समारंभास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना टिकून राहावयाचे असल्यास कष्ट व मेहनत करून अभ्यास करण्याशिवाय पर्याय नाही, असे गौरवोद्गार काढले. तसेच विद्यार्थ्यांचा गुणगौरव आयोजित केल्याबद्दल स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य व पालक वर्गाकडून महाविद्यालयाचे कौतुक व समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

तोडकं मोडकं नाट्यसंस्था यांच्यावतीने द्वितीय वर्धापन दिनानिमित्त रसायनी पाताळगंगा परिसरातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी चावणे, जांभिवली वाडी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्या आले. या कार्यक्रमासाठी चावणेचे मुख्याध्यापक बाळाराम पाटील व जांभिवलीवाडी मुख्याध्यापक संजय पाटील, विक्रम जाधव, राकेश पाटील व तोडकं मोडकं संस्थेचे अध्यक्ष वृषभ मांडवे, उपाध्यक्ष दिव्या पेटकर, सल्लागार रोशन मते आदी कलाकार उपस्थित होते.



# कामगारांच्या प्रश्नांवर आयुक्तांशी चर्चा

**। रसायनी । वार्ताहर ।**

देशात कामगार कल्याणासाठी लढणाऱ्या राष्ट्रीय मूळ निवासी बहुजन कर्मचारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर राष्ट्रीय महासचिव एन.बी.कुरणे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष घरत यांनी पनवेल महानगरपालिका हद्दीतील कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली. कामगारांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावे, अशी मागणी केली. यावर आयुक्त मंगेश चितळे यांनीही कामगारांच्या रास्त मागण्यांकडे लक्ष घालणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी नुरा शेख, जिल्हाध्यक्ष गणेश पाटील, जिल्हा महासचिव संजय घरत, महासचिव सतीश चिंडालिया, सिध्दार्थ मोहिते व संतोष गायकवाड आदी उपस्थित होते.

### टीवायएसएफ, डब्ल्यूडब्ल्यूएकडून स्वच्छता मोहीम

# कनकेश्वर देवस्थान परिसर चकाचक

**। अलिबाग । वार्ताहर ।**

**टुडेस युथ सोशल फाऊंडेशन आणि वाइल्डलाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकतीच कनकेश्वर देवस्थान परिसर स्वच्छता मोहीम पार पाडण्यात आली.**

कनकेश्वर देवस्थान हे रायगड जिल्ह्यातले सर्वात प्राचीन भगवान शंकराचे देवस्थान आहे. निसर्गरम्य परिसर असल्याने भाविक आणि पर्यटकांची गर्दी नेहमीच येथे दिसून येते. परंतु, देवस्थान परिसर आणि संपूर्ण डोंगर येथे प्रचंड प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, खाद्य पदार्थांचे रॅपर, पाण्याच्या तसेच शीतपेयांच्या बाटल्या इत्यादी कचरा दिसून येतो. हाच कचरा टीवायएसएफ आणि डब्ल्यूडब्ल्यूएच्या सक्रिय कार्यकर्त्यांनी स्वच्छ केला तसेच पर्यटकांना कचरा न टाकण्याची विनंती केली.

कनकेश्वर देवस्थान परिसरात आणि पायऱ्यांजवळ होणारा हा कचरा देवस्थानाच्या पावित्र्यास धक्का पोहोचवत आहेच; परंतु इथे आढळणाऱ्या वन्य प्राण्यांच्यासुद्धा जीवावर बेतत आहे. येथील कचऱ्याच्या विल्हेवाटीसंदर्भात नियोजन करणे अत्यंत आवश्यक असून, त्यात कनकेश्वर देवस्थान विश्वस्त आणि स्थानिक प्रशासन ह्यांनी लक्ष घालणे फार आवश्यक असल्याचे डब्ल्यूडब्ल्यूएचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रसाद दाभोळकर यांनी नमूद केले. तसेच ह्या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी




टीवायएसएफचे अध्यक्ष निखिल जैन आणि त्यांची टीम परिश्रम घेत आहेत. दरम्यान, या स्वच्छता मोहिमेनंतर जमा करण्यात आलेल्या कचऱ्याची योग्य रीतीने विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी उपस्थितांकडून देवस्थान परिसरात कचरा न टाकता स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले.

# माथेरानमध्ये गावजत्रेची शेकडो वर्षांची परंपरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या शहरातील गावजत्रेला १२५ वर्षांची परंपरा असून, येथील गावजत्रा उत्साहात साजरी झाली. या गाव जत्रेचा प्रवास माथेरानमध्ये आजही चर्चेचा विषय असून, समस्त गावकऱ्यांचा उपस्थितीत गावजत्रा यशस्वी झाली.

माथेरानची गाव जत्रा १२५ वर्षांपूर्वी सुरू झाली. प्रथम जयराम मास्तर, बाबू सावंत, जोशी तात्या, श्रीपत दळवी, कृषा सुतार, रमेश तावडे, काशिनाथ सावत यांनी सुरू केली. पूर्वी ही जत्रा मोठी होत असे, त्यातच जे नगरपालिकेतील कामावर फैलावर असायचे त्याच्या साठीही जत्रा प्रामुख्याने असायची. त्यानंतर माथेरानमध्ये हळू हळू गावकीचे



स्वरूप येऊ लागले. त्या काळात माथेरानमधील ही जत्रा कायम सुरू राहावी यासाठी मोठी मेहनत घेतली. सावंत मास्तर यांच्या घरी, रोशन वीला, डेल बंगाला आणि आता मटण मार्केटमध्ये जत्रा सुरू आहे. आषाढ एकादशी संपली की माथेरान पिसरनाथ जत्रा उत्साहात साजरी करण्यात येते.

ही जत्रा आजही तिसऱ्या पिढीकडून अविरत सुरू आहे. माथेरानची गावजत्रा म्हणजे एक खवय्यांना मेजवानी आहे. माथेरानच्या घराघरात जत्रेचा वाट्याचा खमंग दरवळत असतो. गावांसाठी एक वेगळा उत्साह आनंद असतो. त्यामुळे माथेरानची जत्रा इतर गावापेक्षा वेगळी आहे. पहाटे सात वाजता ग्राम दैवत पिसारनाथ मंदिरात समस्थ ग्रामस्थ ग्रामदैवत पिसारनाथ दहीभाताचा नैवद्य दाखवून तेथील शितला माता देवीची खणा नारळ यांनी ओटी भरून गावासाठी सुख समृध्दी साठी मनोभावे प्रार्थना केली जाते. या गाव जत्रेत संपूर्ण गावाचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.

यावर्षीची गाव जत्रा यशस्वी होण्यासाठी गावकीचे प्रकाश सुतार, चंद्रकांत जाधव, कुलदीप जाधव, चंद्रकांत सुतार, शैलेंद्र दळवी, विकास पारटे, राजेश दळवी, प्रदीप घावरे, निलेश मढे, विठ्ठल पवार, दत्ता सनगरे, अनता शेलार, प्रदीप शिंदे, राजू जाबरे, राकेश मालुसरे, धोंडू कदम, वर्षा रोड्रिक्स आदी अनेक ग्रामस्थ ग्रामस्थ उपस्थित होते.

निवडक

## बिबट्याचा वावर

**तळा :** तालुक्यातील बोरघरहवेली ग्रामपंचायत हद्दीतील साईधाम येथील जंगलात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरीकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. साईधाम गावातील नागरिक अशोक बडदाड हे सकाळच्या वेळी आपली गुरे घेऊन जात असताना त्यांना जंगलात बिबट्या आढळून आला. तो आपल्या दिशेने येत असल्याचे पाहिल्यावर त्यांनी घाबरून आरडाओरडा करत तेथून पळ काढला. दरम्यान, सध्या ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## अज्ञात चोरट्यांकडून चोरी

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सवणे गावात घरात चोरी झाल्याची घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. फिर्यादी अनंता रामभा देशमुख (७४) यांच्या घरात कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी बंद घराच्या दवाजाचे कडी-कोयंडा तोडून घरामध्ये प्रवेश करून बेडरूममधील कपाट फोडून त्यातील ३५ हजारांची रोकड चोरून नेली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## चोर रेल्वे पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल चोरणाऱ्या एका चोरट्यास रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून मोबाईल हस्तगत केला आहे. दिनेश चव्हाण हे पनवेल लोकलने प्रवास करीत असताना त्यांचा मोबाईल एकाने हिसकावला. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी आर्यन बैनवाल याला ताब्यात घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने प्रवासीवर्गामध्ये भीतीचे वातावरण आहे.

## मारुती सुझुकी गाडीची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन येथील एनएमएमटी बस स्टँडच्या समोर उभी करून ठेवलेली मारुती सुझुकी गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. प्रदीप मुकादम यांनी त्यांची पाच लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी कंपनीची पांढऱ्या रंगाची एमएच-४६-बीझेड-७४६० ही पनवेल रेल्वे स्टेशन येथील एनएमएमटी बस स्टँडच्या समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील चाणाक्य हॉटेलसमोर उभी करून ठेवलेल्या होंडा कंपनीच्या सीबी शाईन कंपनीच्या मोटारसायकलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. सकपालसिंग जावरा यांनी त्यांची २९ हजार रुपये किमतीची होंडा सीबी शाईन कंपनीची ग्रे रंगाची गाडी क्र.एमएच-४६-बीसी-६९४६ ही चाणाक्य हॉटेलच्या समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# जिल्हाभरात गुरुपौर्णिमा उत्साहात

**गुरुप्रतिमा, पादुकांचे पूजन, भक्तीगीते, भजन, गुरुचे महत्त्व सांगणारी प्रवचने अशा विविध उपक्रमांतून जिल्हाभरात रविवारी (दि. २१) गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुपौणिमेनिमित्त जिल्ह्यातील मंदिरे, मठ रंगीबेरंगी फुले आणि रोषणाईने सजविण्यात आले होते. भाविकांनी सकाळीच मंदिरात जाऊन देवदर्शन घेतले. प्रमुख मंदिरे आणि मठांमध्ये दिवसभर भाविकांची वर्दळ होती. सुट्टीचा दिवस असल्याने शाळा-महाविद्यालयांमध्येही आदल्यादिवशी म्हणजे शनिवारी गुरुपौणिमेचा साजरी केली. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात गुरुचे असणारे महत्त्व पटवून दिले.**


● (छायाचित्र : समीर मालोदे)



## चौलच्या दत्तमंदिरात भक्तांची मांदियाळी

### प्रभाकर आगलावेंच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रम

**। चौल । प्रतिनिधी ।**

चौल-भोवाळे येील श्री गुरु दत्ताचे स्वयंभू पवित्र स्थान ओळखल्या जाणाऱ्या दत्तमंदिरात रविवारी (दि.२१) गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. दिवसभर 'दिगंबरा दिगंबरा'च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमला होता. गुरुपौर्णिमेनिमित्त दर्शनासाठी परिसरातून शेकडो भाविक आले होते. मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच विद्युत रोषणाईने अवघा मंदिर परिसर लखलखून निघाला होता.

गुरुपौर्णिमेनिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम मंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पहाटे पाच वाजता दत्त महाराजांच्या मूर्तीला अभ्यंगस्नान करण्यात आले. त्यानंतर महाआरती होऊन मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. दुपारी ११ वाजल्यापासून महाप्रसादास प्रारंभ झाला. रात्री उशिरापर्यंत अन्नदानाचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी भाविक भक्तगण व चौल पंचक्रोशितील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. सर्व भाविकांनी दत्त देवस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अन्नदानाचा लाभ घेतला. हा महाप्रसादाचा कार्यक्रम गेल्या २९ वर्षांपासून गुरव प्रभाकर आगलावे यांच्या पुढाकारातून अखंडित सुरू आहे. या महाप्रसादाचा लाभ आतापर्यंत हजारो दत्तभक्तांनी घेतला असून, गुरव आगलावे यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. गेल्या ४० वर्षांपासून प्रभाकर आगलावे दत्तमहाराजांची निरंतर सेवा करीत आहेत, त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.


● पनवेलमधील गावदेवी मंदिरच्या बाजूला असलेला स्वामी समर्थ मठामध्ये भक्तांची दर्शनासाठी झालेली गर्दी. (छायाचित्र : राजेश डांगळे)


● पनवेलमधील साई संस्थानच्या मंदिरात साईंच्या दर्शनासाठी झालेली गर्दी. (छायाचित्र : राजेश डांगळे)


● श्री साई सिद्धी संस्थान मंदिर, खंडाळे अलिबाग येथील मंदिरात गुरुपौर्णिममेनिमित्त भाविकांनी गर्दी केली होती. (छायाचित्र : नितीन शेडगे)



## बोर्लीपंचतनमध्ये अखंड नामस्मरण

**। म्हसळा । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील दक्षिण सिम्मर ज्ञान मंदिर येथे ब्रह्मलीन सद्गुरु भगवान परमपूज्य श्री जगजीवन बापूंच्या ज्ञानमंदिरामध्ये गुजराती समाजाकडून सकाळी १० वाजता सद्गुरुंचे पूजन तसेच नामस्मरण भजन आणि रास गरबा करत हा उत्सव पार पडला. दरम्यान, पूजन आणि भजन, दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी सद्गुरुंच्या सभामंडपामध्ये रास गरबा करण्यात आला.

## नांदगावमध्ये विविध कार्यक्रम

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या सिद्धकला भजन मंडळाच्या वतीने येथील कलावती आई मंदिरात गुरूपौर्णिमा विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यात सकाळी प्रा:तस्मरण, सायंकाळी व रात्री गुरूपौर्णिमा कार्यक्रमांतर्गत महिला व पुरुष मंडळींचे भजन, पहाटेपासून अखंड नामस्मरण, आरती, प्रसाद वाटप आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात यशवंतनगर पंचक्रोशितील अनेक छोटी मंडळी, महिला, पुरुष सहभागी झाले होते.

## स्वामी समर्थ सेवा केंद्रात उत्सव

**। चौक । वार्ताहर ।**

दरवर्षीप्रमाणे यंदाही चौक येथील दिघे वाडा येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुरुपौर्णिमा येथील मठाधिपती जयवंत दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. पहाटे पाच वाजता श्रींची काकड आरती, स्वामी याग, होमहवन, पाद्यपूजन करून सायंकाळची आरती, भजन, प्रवचन व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे दत्त मंदिर कोल्हापूर पेठ, हनुमान मंदिर तारापूर येथे गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तुपगाव येथील स्वामी समर्थ सेवा केंद्र मध्ये गरजूंसाठी आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात दोनशेहून अधिक गरजूंनी लाभ घेतला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००

● अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी नर्सेसची आवश्यकता आहे. संपर्क :- ९८२२४०९८४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## हिरवळ महाविद्यालयात गुरूपौर्णिमेचा उत्साह



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआयटी) महाडमध्ये विद्यार्थी कौन्सिल विभागामार्फत गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुश्दा झाटम या विद्यार्थिनीने केले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी कृतज्ञता आणि आदर म्हणून महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. स्नेहा मळेकर या विद्यार्थिनीने शिक्षकांप्रती कविता सादर करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आयेशा अन्वरे, सोलिहा मोमीन आणि अल्फिया बागवान यांनी शिष्याच्या आयुष्यात असणारे गुरूचे स्थान याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर सहा. प्राध्यापिका नगीना खल्फे यांनी आपल्या गुरूंचा सन्मान करण्याचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करून गुरुपौर्णिमेविषयी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. सुदेश कदम यांनी गुरु-शिष्य संबंधांवर आपले विचार मांडले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया यांनीही शिक्षकांप्रती आदराचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी गुरुपौर्णिमेचे महत्त्व अधोरेखित करून सर्व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना गुरू पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी आदर, कृतज्ञता आणि ज्ञानाचा पाठपुरावा या मूल्यांना बळ देऊन विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शन करणाऱ्या सर्व गुरुंप्रती मनापासून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रुश्दा झाटम या विद्यार्थिनीने केले.

## नागोठण्यात विविध धार्मिक कार्यक्रम

**। नागोठणे । वार्ताहर ।**



नागोठण्यातील खडकआळी भागातील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास केंद्रात गुरुपौर्णिमा मोठ्या स्वरूपात व उत्साहात साजरी करण्यात आली. येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मठात गुरुपौर्णिमेनिमित्त रविवारी (दि.२१) सकाळपासूनच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या केंद्रातील गुरुपौर्णिमेची सुरुवात सकाळी पाच वाजता पूजाविधीने करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन सुरु करण्यात आले. सकाळी ८.३० व १०.३० वाजता तसेच सायंकाळी ६.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती घेण्यात आली. या आरतीला महिला व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय श्री स्वामी समर्थ महाराजांच्या या आध्यात्मिक केंद्रात सकाळपासून रात्रीपर्यंत दर्शन व सप्तशृंगी पाठाचे वाचन भक्तगणांकडून करण्यात आले. गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात साजरा होण्यासाठी खडकआळी ग्रामस्थ व स्वामी सेवेकऱ्यांनी मेहनत घेतली.

## ओम साई मंडळातर्फे पायी पालखी दिंडी




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील अध्यात्मिकतेचा व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चिरनेर गावातील ओम साई सेवा मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील गुरुपौर्णिमेनिमित्त चिरनेर ते साईमंदिर वहाळ पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ओम साई सेवा मंडळ चिरनेरतर्फे गेल्या बारा वर्षांपासून मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली साईंच्या पायी पालखी दिंडीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी ही बारावी पदयात्रा असून, रविवारी पायी पालखी दिंडीचा शुभारंभ चिरनेर येथील श्री महागणपती मंदिरातून श्रींची महाआरती करून करण्यात आला.

याप्रसंगी चिरनेरचे उद्योगपती राजेंद्र खारपाटील, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, पोलीस पाटील संजय पाटील, चिरनेर तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर, दिग्दर्शक संतोष ठाकूर, ग्राहक मंचाचे शशांक ठाकूर, वारकरी दत्ता मोकल, समीर डुंगीकर, निकिता नारंगीकर, उद्योजक घनश्याम पाटील यांच्यासह चिरनेर ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी कार्याध्यक्ष गजानन फुंडेकर, सल्लागार बबन ठाकूर, सल्लागार हरिश्चंद्र मोकल, सल्लागार गजानन म्हात्रे, सल्लागार रमेश म्हात्रे, अध्यक्ष अमित मुंबईकर, उपाध्यक्ष नितीन नारंगीकर, सचिव संतोष चिर्लेकर खजिनदार प्रसाद पाटील या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. दरम्यान, पालखी दिंडी रांजणपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रस्थान झाल्यानंतर ओम साई सेवा मंडळाकडून साई भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर पायी पालखी दिंडीचे साई मंदिर वहाळकडे प्रस्थान झाले. वहाळ साई संस्थेचे अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी साई भक्तांचे स्वागत केले. साईंचा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई सेवा मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.


● (छायाचित्र : संजय गायकवाड)

## कर्जत एज्युकेशन सोसायटीमध्ये शिक्षकांचे पूजन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

आषाढ पौर्णिमा म्हणजेच गुरूपौर्णिमा. आपल्या संस्कृतीचे जतन करत काळासोबत शिक्षणाचा ध्यास घेऊन सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या कर्जत एज्युकेशन सोसायटी या शिक्षणसंस्थेच्या कर्जत व कडाव या शाळेत गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली.

संस्थेच्या कर्जत शाळेत सकाळ व दुपार अशा दोन्ही सत्रात गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. सकाळच्या सत्रात प्रमुख पाहुण्या म्हणून मृदुल गडणीस उपस्थित होत्या. संस्थेचे सदस्य सतीश पिंपरे यांच्या उपस्थितीत शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी यांनी गडणीस यांचे स्वागत केले, तसेच दुपारच्या सत्रात संस्थेचे सदस्य राजेश भुतकर यांच्या उपस्थितीत प्रमुख पाहुण्या म्हणून वृषाली वैद्य यांचे स्वागत करण्यात आला.

संस्थेच्या कडाव येथील शाळेतही गुरूपौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका यांनी संस्थेचे सदस्य सतीश पिंपरे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांसोबत गुरूपौर्णिमा साजरी केली. यावेळी उपस्थित शिक्षकांनी गुरुचे महत्त्व आपल्या आयुष्यात किती महत्त्वपूर्ण आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करुन दिली.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती असलेल्या भावना आपल्या मनोगतातून व्यक्त करीत शिक्षकांचे पाद्यपूजन केले.

# उरण तहसील कार्यालयात गळती

## पाय घसरून दुखापत होण्याची भीती

। उरण । वार्ताहर ।

उरण तहसील कार्यालयातील आरसीसी स्लबला पाण्याची गळती लागल्याने सध्या पावसाळ्यात कार्यालयात ये-जा करणाऱ्या विद्यार्थी, नागरिक व शेतकऱ्यांवर जलाभिषेक होत आहे. त्यामुळे लाद्यावर साचून राहणाऱ्या पाण्यात पाय घसरून दुखापत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तरी, उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी जातीने लक्ष घालून दुरुस्तीचे काम हाती घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग उरणला आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

उरण तहसील कार्यालयात दररोज अनेक विद्यार्थी, नागरिक, शेतकरी हे आपली महसूल संबंधित तसेच शासकीय कामे करण्यासाठी ये-जा करीत आहेत. मात्र, अशा विद्यार्थ्यांना, नागरिकांना, शेतकऱ्यांना कार्यालयातील अनेक नागरी सुविधांच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यातच मागील काही वर्षांपासून उरण तहसील कार्यालयाला पावसाळ्यात लागलेल्या गळतीची ही समस्या गंभीर बनली होती. यासंदर्भात तसेच कार्यालयातील नागरी सुविधांसंदर्भात अनेक वेळा आवाज उठवण्यात आला होता.



मात्र, संबंधित प्रशासनाने तहसील कार्यालयात पिण्याचे पाणी, शौचालय, बसण्याचे बाकडे यांची योग्य प्रकारे सांगड न घालता, फक्त लाखो रुपये खर्चून इमारतीच्या छतावर नियोजनशून्य कारभारातून पत्र्याची शेड तयार केली. त्यामुळे याही वर्षीच्या पावसाळ्यात तहसील कार्यालयातील आरसीसी स्लॅबला पाण्याची गळती लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत, लाद्यावर साचून राहणाऱ्या पाण्यात पाय घसरून एखाद्याला दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी जातीने लक्ष घालून तातडीने दुरुस्तीचे काम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

## विश्वनाथ माळी यांचे निधन

। कोलाड । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील पाली आगरआळी येथील रहिवासी विश्वनाथ उर्फ दादा माळी यांचे मंगळवार, दि. १६ जुलै रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच अंत्यदर्शनासाठी नातेवाईक,



सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, भाऊ, भावजय, पुतणे, जावई, नातवंडे, मोठा माळी परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार, दि.२५ जुलै रोजी उद्धर रामेश्वर येथे, तर उत्तरकार्य विधी दि. २८ जुलै रोजी होणार आहे.

## गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचा पुण्यात डंका

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापुरातील विद्यार्थ्यांना कमीत कमी शैक्षणिक शुल्क आकारत दर्जेदार इंग्रजी सीबीएससी शिक्षण देणाऱ्या केटीएसपी मंडळाच्या प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी केलेल्या मेहनतीमुळे पुण्यातील प्रिन्सिपल कॉन्क्लेव्ह सन २०२४-२५ साठी प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'आऊटस्टँडिंग इम्प्लिमेंटेशन ऑफ लाइफ स्किल्स प्रोग्राम' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शाळेचे तसेच शिक्षकांचे आणि संस्था चालकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांची स्पर्धा असतानाही संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील आणि सर्व सदस्यांनी जिद्दीने शाळा सुरू करण्यासाठीचा निर्णय घेतला आणि शाळेला उभं करण्याची जबाबदारी जनता विद्यालयाचे अध्यक्ष दिनेश गुरव यांच्याकडे दिली. त्यांना शाळेचे पहिले मुख्याध्यापक गौरव तिवारी यांनी मोलाची साथ दिली.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

# समीप दिसे पंढरी, याच मंदिरी माझी माऊली

## नाट्य दिग्दर्शक संतोष ठाकूर यांनी केले अभंगातून स्वच्छतेचे प्रबोधन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठलनामाचा गजर व टाळ-मृदुंगाच्या निनादाने पांडुरंगाची पंढरी बुधवारी दुमदुमून गेली होती. उरण तालुक्यातील भाविकांना पंढरपूरच्या विठू माऊलीचे दर्शन घेण्यासाठी उरण ते पंढरपूर अशी वारीसाठी उरण एसटी आगारातर्फे एसटी बसची व्यवस्था करण्यात आली होती. चिरनेरचे नाट्य दिग्दर्शक तथा विठ्ठलभक्त संतोष ठाकूर यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वारीत सहभाग घेतला होता. दरम्यान, त्यांच्या मार्गदर्शनाखाली या वारीचे नियोजन करण्यात आले होते.




वारीत विठ्ठल, विठ्ठल जय हरी विठ्ठल, राम कृष्ण हरी असा विठू नामाचा गजर झाला. उरणचे आगार व्यवस्थापक श्री. दराडे, पनवेल आगाराचे व्यवस्थापक श्री. म्हात्रे, महेश लहिटे, संतोष ठाकूर, वाहक अशोक कोळी, कांचन ठाकूर, कृष्णा कोळी व प्रमोद पाटील या सर्वांनी दिंडीतील नागरिकांची काळजी घेत, त्यांची मनोभावे सेवा केली. यावेळी प्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक संतोष ठाकूर यांनी स्वरचित अभंग रचनातून स्वच्छता, पर्यावरण व संवर्धन याचे महत्त्व पटवून दिले. तसेच पनवेलचे आगार व्यवस्थापक श्री. म्हात्रे यांना पनवेल ते आवरे या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास बस सुरू करण्याबाबत संतोष ठाकूर यांनी विनंती केली. कांचन ठाकूर, महेश लहीटे संतोष ठाकूर प्रमोद पाटील या सर्वांनी फळे, पाणी, बिस्कीट व लाडूच्या नाश्त्याची व्यवस्था केली होती.

## आचारसंहितेत अडकलेली 'साडी' रेशनकार्ड लाभार्थ्यांना मिळाली का?

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

लोकसभानिवडणुकीच्याआधी अंत्योदय रेशनकार्डधारकांना एक साडी भेट देण्याची घोषणा करण्यात आली. मात्र, आचारसंहिता लागू झाल्यानंतर हे वाटप थांबले होते. ते वाटप आता सुरु होणार आहे. दारिद्र्यरेषेखालील कार्डधारकांना शासनाकडून दरवर्षी एक साडी देण्याचे शासनाने सुरू केले.

पनवेल तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील ६ हजार ६६३ कार्डधारकांना साडी वाटप करण्यात येणार आहे. पुरवठा विभागातर्फे रेशनिंग दुकानात साड्या पोहोच करण्यात आलेल्या आहेत. यापैकी १ हजार ७३४ साड्यांचे वाटप करण्यात आले. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यामुळे साडी वाटपाचे काम थांबवण्यात आले. मात्र, आता आचारसंहिता संपल्याने राहिलेल्या साडी वाटपाला सुरुवात करण्यात येणार आहे.

पनवेल तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ६ हजार ६६३ कार्डधारकांना साडी मिळणार आहे. लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी साड्यांचे वाटप करण्यात येत होते. मात्र, आचारसंहिता सुरू झाल्याने ते वाटप थांबवण्यात आले होते. मात्र, आता आचारसंहिता संपल्याने लवकरच साडीवाटप सुरू होणार असल्याची माहिती तहसील विभागाकडून देण्यात आली. साडी वाटप करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे सांगण्यात आले.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# पाऊस-महावितरणचे कधी जमणार?

## शहरासह तालुक्यामध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यामध्ये मागील दोन आठवड्यांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. परंतु, पावसाला सुरुवात झाल्यानंतर महावितरणचा वीज पुरवठा लागलीच खंडित होतो. महावितरण कडून पावसाळा वगळता महिन्यातून दोन ते तीन वेळा देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो. तर, पाभरे येथील विद्युत केंद्रापासून श्रीवर्धन येथील उपविद्युत केंद्रापर्यंत येणाऱ्या वीजवाहिन्या या जंगल मार्गातून येत असल्यामुळे सदर वीज वाहिन्यांच्या बाजूला वाढलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्यासाठीदेखील अनेक वेळा वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. परंतु, एवढे सगळे खटाटोप करूनसुद्धा पावसाला सुरुवात झाल्याबरोबर वीजपुरवठा खंडित होतो.




श्रीवर्धन म्हसळा या तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती पाहता या ठिकाणच्या मुख्य विद्युत वाहिन्या या भूमीगत असणे आवश्यक आहे. कारण, श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटनाच्या दृष्टीने खूप मोठ्या प्रमाणात बहरलेला आहे. या ठिकाणी पर्यटक खूप मोठ्या प्रमाणात येतात. पावसाळ्यात पर्यटकांचे प्रमाण जरी कमी असले, तरी पावसाळा संपल्यानंतर म्हणजेच साधारण गणेशोत्सव संपल्यानंतर या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात येण्यास सुरुवात होते.

मोठमोठ्या शहरातून येणाऱ्या पर्यटकांना वातानुकूलित खोल्यांमध्ये राहण्याची सवय असते. श्रीवर्धन शहरातील काही मोठी हॉटेल्स व रिसॉर्ट वगळता अन्य होम स्टे व छोट्या हॉटेल्स मालकांकडे जनरेटरची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर त्या ठिकाणी येणारे पर्यटक नाराजी व्यक्त करतात. तरी महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाने या ठिकाणच्या विद्युत वाहिन्या पूर्णपणे भूमीगत करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## 'संवेदनशील चांदण्या' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

। खरोशी । वार्ताहर ।

साहित्यिक कवी लेखक सेवानिवृत्त केंद्रप्रमुख एन.जे. पाटील यांच्या 'संवेदनशील चांदण्या' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

काव्यप्रेमी शिक्षक संघ रायगड आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पेण पंचायत समितीचे माजी गट शिक्षणाधिकारी पी.डी. पाटील होते. तर प्रमुख पाहुणे नवी मुंबईचे माजी शिक्षणाधिकारी डी.आर. तायडे, लेखक व कवी एल.बी. पाटील, आगरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिरीष पाटील, कवी एन.जे. पाटील, रत्नप्रभा पाटील, सुधाकर पिंगळे,चंद्रकांत पाटील, म.वा म्हात्रे, अमरचंद पाटील, रविकांत ठाकूर एस.एस.पाटील, लवेंद्र मोकल, दिनानाथ पाटील, र.मो.पाटील आदी मान्यवरांसह केंद्रप्रमुख शिक्षक कवी लेखक, गोल्डन ग्रुपचे सभासद व पेणकर उपस्थित होते.

कार्यक्रम महात्मा गांधी वाचनालय पेण येथे आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविकात एस.एस. पाटील यांनी एन.जे. पाटील यांच्या जीवनाच्या अनेक पैलूंचा उलगडा केला. व रूपरेषा सांगितली. यावेळी एल.बी. पाटील, रविकांत ठाकूर, संदेश गायकवाड आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित कवींनी कविता सादर केल्या. सूत्रसंचालन स्नेहलता वर्तक यांनी, तर आभार सुधाकर पिंगळे यांनी मानले.



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या **मौजे- वहाळ** बांधकाम क्रमांक **UL-२७९, २७९A, २७९B, UL- २८०, क्षेत्र- ७०० चौ.मी. व हे. आर** या संपादित जमिनीचे बांधकामधारक **श्री. रविंद्र मोहन खारकर, श्रीमती. शारदा मोहन खारकर, सौ. सीमा नरेंद्र पाटील, श्री. समीर मोहन खारकर** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकती पोटी त्यांना **पुष्पक नोड (वहाळ)** येथील **भूखंड क्र.४५५D, सेक्टर- २४, क्षेत्र-७०० चौ.मी.** चे संचिका क्र. **ULV-ICOGD**-७२ वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

पुष्पक (वहाळ) येथील **भूखंड क्र. १२९, सेक्टर- २४, क्षेत्र- ७०० चौ. मी. हा भूखंड श्री. रविंद्र मोहन खारकर, श्रीमती. शारदा मोहन खारकर, सौ. सीमा नरेंद्र पाटील, श्री. समीर मोहन खारकर** यांना वाटपित करण्यात आला असून, सदर भूखंडाचा दि.२२.११.२०१८ रोजी भाडेपट्टा करारनामा करण्यात येवून नोंदणीकृत करण्यात आला आहे. तदनंतर काही तांत्रिक कारणास्तव भूखंडात बदल करुन **भूखंड क्र.१२९, सेक्टर-२४,क्षेत्र-७०० चौ.मी** ऐवजी **भूखंड क्र.१५, सेक्टर-R-२, क्षेत्र- ७०० चौ.मी.** वाटपीत करण्यात येवून **क्र. सिडको/अमुभुवभु(नमुंआंवि)/२०१७/११२८, दि.०७.०२.२०१९** हे शुद्धीपत्रक देण्यात आले आहे. तदनंतर **श्री. शशिकांत जर्नादन केणी व श्री. रविंद्र मोहन खारकर व इतर ३** यांनी भूखंड अदलाबदलीची विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने सदर प्रस्तावास मा. सह-व्यवस्थापकीय संचालक यांची मान्यता घेवून **भूखंड क्र.१५, सेक्टर-R-२, क्षेत्र- ७०० चौ.मी.** ऐवजी **भूखंड क्र.४५५D, सेक्टर- २४, क्षेत्र- ७०० चौ.मी. भूखंडा बदलीबाबतची क्र. सिडको/अमुभुवभुअ/२०२१/२२५, हे शुद्धीपत्रक दि.०३.०२.२०२१ रोजी देण्यात आलेले आहे. तसेच त्याचप्रमाणे चुक दुरुस्तीपत्रक (Rectification Deed) दि.१२.०५.२०२२ रोजी देण्यात आले आहे.**

या अनुषंगाने **भूखंड क्र.४५५D, सेक्टर-२४, क्षेत्र-७०० चौ.मी.** या भूखंडाचे **भूधारक श्री. रविंद्र मोहन खारकर, श्रीमत शारदा मोहन खारकर, सौ. सीमा नरेंद्र पाटील, श्री. समीर मोहन खारकर** हे असून **श्रीमती शारदा मोहन खारकर, सौ. सीमा नरेंद्र पाटील, श्री. समीर मोहन खारकर** यांनी **हक्कसोडपत्रक नोंदणी क्र. पवल-१-३०६५-२०२४ पावती क्र.४२६९, दि.२२.०४.२०२४ रोजी अन्वये श्री. रविंद्र मोहन खारकर** यांच्या लाभांत विना मोबदला हक्कसोडपत्रक तयार करण्यात आले आहे यानुसार सदर भूखंडातून त्यांचे नाव कमी करण्याकरीता ऑनलाईन सीएफसी अर्जान्वये दि.२४.०६.२०२४ रोजी करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात खालील कागदपत्रे दिसून येत आहेत.

दुय्यम निबंधक **पनवेल-१ नोंदणी क्र. पवल-१-३०६५-२०२४ पावती क्र.४२६९, दि.२२.०४.२०२४ रोजी** यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपीत झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत.

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमूद केल्यानुसार खालील त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क २ खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे :-

| अ. क्र. | हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाडयातील जाहिर खातेदार हक्कसोडपत्र लिहुन घेणार (ii) |
|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | श्रीमती शारदा मोहन खारकर<br>सौ. सीमा नरेंद्र पाटील<br>श्री. समीर मोहन खारकर | १. श्री. रविंद्र मोहन खारकर |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भुखंडधारक म्हणुन नोंद घेण्यात येत आहेत. व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडातील भुखंड करारामधील आपले हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तींच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे "**ना हरकत प्रमाणपत्र**" देण्यात आल्यानंतर भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळमजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक (शहरसेवा-३)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१०३/२०२४-२५



# शेतकऱ्यांचा बांधावर जाऊन सन्मान

## रायगड प्रेस क्लबतर्फे रतीश मगर, केशव खरीवले सन्मानित

। चणेरा । प्रतिनिधी ।

रायगड प्रेस क्लब व रोहा प्रेस क्लबच्या वतीने तालुक्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा शेतीच्या बांधावर जाऊन सन्मान करण्यात आला. घोसाळेतील प्रयोगशील युवा शेतकरी रतीश मगर आणि सांगडे येथिल केशव खरिवले यांना आदर्श शेतकरी म्हणून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज शेती व्यवसायापासून दूर जातोय हे वातस्व असतानाच, रायगड प्रेस क्लब अभिनव उपक्रम सुरू केला. बळीराजाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रेस क्लबच्या माध्यमातून जिल्ह्यातील कृतीशील प्रगत आणि शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन दरवर्षी केला जातो. या अनुषंगाने रोहा प्रेस क्लबच्या वतीने नुकतेच आदर्श शेतकरी सन्मानाने प्रयोगशील युवा शेतकरी रतीश मगर आणि केशव खरिवले यांना त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याला रोहा तालुका कृषी अधिकारी महादेव करे, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, अधिकारी कांबळे आण्णा, प्रिया कांबळे, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरीवले, कृषी अधिकारी प्रकाश राक्षीकर, राजेंद्र जाधव, पोलीस अधिकारी सुनील शिरसाट, शरद कोटकर, गणेश ढेरे, युवा कार्यकर्ते महेश तुपकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**अलिबाग नगरपरिषद**

**जाहीर निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेच्या इ. १ ते ८ तील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण पुरविणेकामी खालीलप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरी निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळणेची अंतिम तारीख व वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ.न.प. शाळा १ ते ६ मधील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे | रू. ५००/- | रू. ५०००/- | २२/०७/२०२४ ते २९/०७/२०२४ सकाळी ११ ते २ कार्यालयीन वेळेत | ३०/०७/२०२४ सायं ५.०० वाजेपर्यंत |

सूचना :- १) निविदेबाबतची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत महिला व बालकल्याण विभागात मिळेल.
२) निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असून लिफाफा नं. १ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं. २ मध्ये वित्तीय बोलीचा फॉर्म सादर करण्याचा आहे. दोन्ही लिफाफ्यावर कामाचे नाव व लिफाफा नंबर नमूद करावा.
३) राष्ट्रीयकृत बँकेकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी व धनाकर्ष स्वतंत्र लिफाफ्यात निविदेसोबत सादर करावा.
४) देयकातून सुरक्षा अनामत रक्कम १०% कपात करण्यात येईल.
५) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
**(अंगाई साळुंखे)**
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel**
**SRM e-Tender Notice No. 03/2024-25**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 27/2024-25 | 7000032300 | Providing services of 6 nos of skilled labour at EHV CCCM DN Panvel, EHV CCCM Sub-Dn Panvel, Kharghar, Kalyan at EHV CCCM Dn Panvel for FY 2024-25.(01.07.2024 to 31.03.2025) (III[rd] call) | 1457341.00 |
| 28/2024-25 | 7000032301 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kalyan (Annual Contract) for the year 2024-25.(01.07.2024 to 31.03.2025) (III[rd] call) | 444347.00 |
| 29/2024-25 | 7000032302 | Annual civil maintenance works for Wasamabe Colony/ 220KV Apta/200KV Tambati/100KV Khopoli S/stn along with colony with other civil works for F.Y 2024-25. (III[rd] call) | 1999441.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: *www.mahatransco.in.*
Contact person: Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325
**Sd/-**
**Executive Engineer (Civil), Panvel**

**निवडक**

## बीसीसीआयची मदत

**नवी दिल्ली :** पॅरिसमध्ये २६ जुलैपासून ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा खेळली जाणार आहे. या खेळांच्या कुंभमेळ्या भारतीय खेळाडूही मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे. यासाठी आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मदतीचा हात पुढे केला आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी जाहीर केले आहे की बीसीसीआयकडून भारतीय ऑलिम्पिर संघटनेला ८.५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

## टेनिसपटूंनी रचला इतिहास

**नवी दिल्ली :** भारताचा दिग्गज टेनिसपटू लिअँडर पेस आणि खेळाडू, टेनिस प्रसारक विजय अमृतराज यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पेस आणि विजय यांना आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेममध्ये सामील करण्यात आले आहे. त्यांना दिग्गज ब्रिटिश टेनिस पत्रकार आणि लेखक रिचर्ड इवान्स यांच्यासह हॉल ऑफ फेममध्ये सामील करण्यात आले. पेस आणि विजय हे आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेममध्ये सामील होणारे पहिले आशियाई पुरुष खेळाडू ठरले आहेत.

## रोहितचं नाव होणार अजरामर

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत इतिहास रचू शकतो. भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २ ते ७ ऑगस्ट दरम्यान कोलंबोमध्ये खेळली जाणार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेदरम्यान जर रोहित शर्मा २ शतकं झळकावण्यात यशस्वी ठरला, तर तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचा मोठा विक्रम करू शकेल.

## ‘पदकांसाठी ड्रॉची गरज’

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताचे सहा मल्ल पात्र ठरले असून कुस्तीच्या स्पर्धा ५ ऑगस्टपासून सुरू होत आहेत. सहापैकी अमन सेरावत हा एकमेव पुरुष कुस्तीपटू आहे, उर्वरित पाच महिला कुस्तीगीर आहेत. २००८ बीजिंग ऑलिंपिकपासून भारतीयांनी कुस्तीत पदके मिळवलेली आहेत. यावेळीही अधिक पदकांची आशा आहे, केवळ चांगला ड्रॉ मिळायला हवा. किमान तीन पदके मिळतील, असे योगेश्वरने सांगितले आहे.

## श्रेयंका पाटील स्पर्धेतून बाहेर

**कोलंबो :** भारतीय महिला संघ सध्या श्रीलंकेचे यजमानपद असलेल्या टी-२० आशिया चषकात खेळत आहेत. परंतु आता भारतीय संघाला ऑफस्पिनर श्रेयंका पाटीलच्या रूपाने मोठा धक्का बसला आहे. ती बोटाला फ्रॅक्चर झाल्याने संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडली आहे. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात श्रेयंका पाटीलला झेल घेताना दुखापत झाली होती. श्रेयंकाला तिच्या डाव्या हाताच्या सर्वात लहान बोटात फ्रॅक्चर झाले आहे.

# भारताचा विजय

### उपांत्य फेरीतील स्थान पक्के

**। डंबुला । वृत्तसंस्था ।**

महिला आशिया चषक २०२४ स्पर्धेत रविवारी (दि.२१) भारतीय संघाने संयुक्त अरब अमिराती संघाला ७८ धावांनी विजय मिळवला. हा भारतीय महिला संघाचा या स्पर्धेतील सलग दुसरा विजय आहे. त्यामुळे भारतीय संघाने उपांत्य फेरीतील स्थान जवळपास पक्के केले आहे.

युएईने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ५ बाद २०१ धावा केल्या होत्या. भारताची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. स्मृती मानधना तिसऱ्याच षटकात १३ धावांवर झेल बाद झाली. यानंतर पॉवरप्ले संपण्याच्या आधीच आक्रमक खेळणारी शफाली वर्मा आणि दयालन हेमलता बाद झाली. शफालीने १८ चेंडूत ३७ धावा तर हेमलताने २ धावा केल्या. यानंतर कर्णधार हरमनप्रीतने जेमिमाह रोड्रिग्ससह डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अर्धशतकी भागीदारीही केली. पण जेमिमाह १४ धावा करून बाद झाली. परंतु, यानंतर हरमनप्रीत कौर आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋचा घोष यांनी अर्धशतके झळकावली. भारतीय संघाने १०६ धावांवर ४ गडी गमावलेले असताना या दोघींनी ७५ धावांची भागीदारी केली. पण २० व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर हरमनप्रीत ६६ धावांवर धावबाद झाली. ऋचा घोषने नाबाद ६४ धावा ठोकल्या. युएईकडून काविशा एगोडागेने २ बळी घेतले. तसेच, समायरा धंधारका आणि हीना होतचंदानी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

भारतीय संघाने दिलेल्या २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संयुक्त अरब अमिरातीची फारशी चांगली सुरुवात झाली नव्हती. रेणुका सिंग ठाकूर, पुजा वस्त्राकर आणि दिप्ती शर्मा यांनी सुरुवातीलाच मोठे धक्के त्यांना दिले होते. त्यांनी ३६ धावांवरच ३ गडी गमावले होते.




कर्णधार ईशा ओझाला काविशा एगोडागेची साथ मिळाली. त्यांनी ४० धावांची भागीदारी केली. मात्र, असे असले तरी त्यांना धावगती नियंत्रित ठेवता आली नाही. त्यातच पदार्पण केलेल्या तनुजा कन्वरने ईशाला ३८ धावांवर माघारी धाडले. एका बाजूने काविशाने लढत होती. मात्र, कोणाकडूनही तिला साथ मिळाली नाही. त्यामुळे अखेर युएईला या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारताकडून दिप्ती शर्मा हिने २ बळी घेतले. तर, रेणुका ठाकूर, तनुजा कन्वर, पुजा वस्त्राकर आणि राधा यादव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.







## भारतीय संघ निवडीवर बद्रीनाथची टीका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका दौऱ्यावर भारतीय संघाला तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. यासाठी भारतीय संघाची घोषणा आधीच करण्यात आली आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आहे. टी-२० संघाची कमान सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली आहे. शुभमन गिलला एकदिवसीय आणि टी-२० या दोन्ही फॉरमॅटचा उपकर्णधार बनवण्यात आले आहे. या दौऱ्यातूनच संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर जबाबदारी स्वीकारणार आहेत. पण भारतीय संघाच्या नावाची घोषणा झाल्यापासून संघ निवडीवर सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

हार्दिक पांड्याला कर्णधार न बनवण्यावर आणि झिम्बाब्वे दौऱ्यावर चांगली कामगिरी करणाऱ्या अभिषेक शर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांना संघातून वगळण्यावर दिग्गज माजी खेळाडूंकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता भारताचे माजी फलंदाज सुब्रमण्यम बद्रीनाथ याने आपली प्रतिक्रिया व्यक्त केल्याने नव्या वादाला सुरुवात झाली आहे. बद्रीनाथने ऋतुराज गायकवाडला दोन्ही संघात स्थान न मिळाल्याने आणि रिंकू सिंगला एकदिवसीय संघात स्थान न मिळाल्याने वादग्रस्त टिप्पणी केली आहे. एका कार्यक्रमात तो म्हणाला की, काहीवेळा असे दिसते की कामगिरीव्यतिरिक्त, संघात निवड होण्यासाठी तुम्हाला दुसरी प्रतिमा आवश्यक आहे. रिंकू सिंग, ऋतुराज गायकवाड यांसारख्या खेळाडूंची भारतीय संघात निवड होत नाही, तेव्हा असे वाटते की संघात निवड होण्यासाठी बॉलीवूड अभिनेत्रीशी संबंध, एक चांगला मीडिया मॅनेजर आणि शरीरावर टॅटू आवश्यक आहेत.



## ‘नेमबाज संघाकडून पदकाच्या आशा’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धा तोंडावर आलेली असताना राष्ट्रीय रायफल संघटनेने नेमबाजांचा संघ जाहीर केला. हा संघ अगोदर जाहीर करता आला असता तर खेळाडूंना तयारीसाठी अधिक वेळ मिळाला असता, असे असले तरी भारताच्या या जम्बो नेमबाज संघाकडून पदकाच्या आशा आहेत, असाही विश्वास सोधीने व्यक्त केला आहे.



ऑलिंपिकच्या इतिहासात प्रथमच अधिक नेमबाजांचा संघ पॅरिसमध्ये खेळणार आहे. २०२१ मध्ये झालेल्या टोकिया ऑलिंपिक स्पर्धेत १५ नेमबाजांचा संघ सहभागी झाला होता; परंतु एकही पदक मिळाले नव्हते. त्या अगोदरच्या ऑलिंपिक स्पर्धेतही नेमबाजांची पाटी कोरी राहिली होती. या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत भारताचे २१ नेमबाज स्पर्धा करणार आहेत. भारताच्या नेमबाजीच्या इतिहासात हा सर्वात मोठा संघ आहे. त्यांच्याकडून पदकाची अपेक्षा असल्याचे रंजन सोधी यांचे मत आहे.

## ब्लॅक बेल्ट पदविका परीक्षा संपन्न

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे ओकिनावा शोरीन रियू कराटे डो उडेन टी कोबुजुत्सू असोसिएशनच्या वतीने क्योशी विजय तांबडकर आणि साहाय्यक प्रशिक्षक रेंन्शी अभिषेक तांबडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण शिबीर व ब्लॅक बेल्ट पदविका परीक्षा घेण्यात आल्या होत्या.

या शिबिरात मुंबई व रायगड जिल्ह्यांतील खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये मुंबईतील आशुतोष शेखर दंडवते, नांदगाव येथील अनिह भालचंद्र जोशी आणि अमोघ समित दळवी तसेच मजगाव येथील ध्रुव शिल्पा कळके यांनी चमकदार कामगिरी करून ब्लॅक बेल्ट पटकाविला आहे. ब्लॅक बेल्ट पटकावणारे सर्व विद्यार्थ्यांनी यापूर्वी जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर स्पर्धेत पदक मिळाले असून अमोघ दळवी याने राष्ट्रीय पातळीपर्यंत मजल गाठली आहे. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून गावातील क्रीडा प्रेमिंकडून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## क्रिकेटनंतर आता रेसिंगमध्ये ‘दादा’गिरी


**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन रेसिंग फेस्टिव्हलचा नवीन सीझन २४ ऑगस्टपासून सुरू होत आहे. पहिल्यांदाच रात्रीची शर्यत ही चेन्नईच्या स्ट्रीट रेसिंग सर्किटमध्ये ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी राऊंड २ चा भाग म्हणून आयोजित केली आहे. आता याचा तिसरा सीजन लवकरच येणार आहे. यामध्ये भारताचा माजी क्रिकेटपटू सौरव गांगुलीने देखील उडी घेतली आहे. २०२४ च्या सीझनमध्ये कोलकता रॉयल टायगर्स रेसिंग या संघाचा तो मालक असणार आहेत. यामध्ये इंडियन रेसिंग लीग आणि फॉर्म्युला ४ इंडियन चॅम्पियनशिप अशा दोन मुख्य चॅम्पियनशिपचा समावेश आहे. कोलकाता, हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई, दिल्ली, गोवा, कोची आणि अहमदाबाद या प्रमुख आठ शहरांवर आधारित संघांची स्पर्धा ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीत दरम्यान होणार आहे. ही स्पर्धा रोमहर्षक असून कोलकाता संघ नव्याने दाखल झाल्याने या स्पर्धेची उत्सुकता अजून वाढली आहे. कोलकाता रॉयल टायगर्स ही सौरव गांगुलीच्या मालकीची टीम असल्याने पश्चिम बंगाल आणि पूर्व भारतात मोटर रेसिंगला अधिक उत्साह आणि प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे अंदाज आहेत.

## पॅरा ऑलिंपिकच्या आखाड्यात माणदेशी रत्न

**। आटपाडी । वृत्तसंस्था ।**

पॅरिस येथे ऑगस्टमध्ये होणाऱ्या पॅरा ऑलिंपिकच्या आखाड्यात माणदेशातील आटपाडीच्या मातीत घडलेले सचिन सर्जेराव खिलारी आणि सुकांत इंद्रजित कदम उतरणार आहेत. राज्यातून पॅरा ऑलिंपिकसाठी निवड झालेल्या १२ खेळाडूंत आटपाडीच्या या दोघांचा समावेश आहे. जागतिक क्रमवारीत दोघेही अव्वल स्थानी असल्याने त्यांच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा आहे. पदक मिळवण्याचा दोघांनाही विश्वास आहे.






करगणीचा सचिन खिलारी गोळाफेकीत, तर दुसरा कौठुळीचा सुकांत कदम बॅडमिंटनमध्ये सहभागी होणार आहे. सचिनचा बालपणी अपघात झाल्याने एका हाताला अपंगत्व आले होते. तो गोळाफेकीत सहभागी होणार आहे. काही दिवसांपूर्वी त्याने जागतिक पॅराॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांच्या ‘शॉटपूट एफ ४६’मधून सुवर्णपदक पटकावले आहे. दुसरीकडे सुकांत क्रिकेट खेळताना पडल्याने गंभीर दुखापत झाल्याने गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागली होती. तो बॅडमिंटन खेळतो. जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असून पुरुष दुहेरीत प्रमोद भगतचा जोडीदार आहे. ही जोडी पॅरामधून जागतिक स्तरावर अव्वल स्थानी आहे. सचिन आणि सुकांत या दोघांच्या पॅरा ऑलिंपिकमधील कामगिरीकडे संपुर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## लक्ष्मण परतणार आयपीएलमध्ये

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक स्टाफमध्ये मोठा बदल झाला आहे. आता राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या पदांमध्येही बदल होण्याची शक्यता आहे. सध्या बंगळुरू येथे असलेल्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचा प्रमुख म्हणून व्हीव्हीएस लक्ष्मण काम पाहात आहे. पण त्याचाही कार्यकाळ लवकरच संपणार आहे. यादरम्यान, एका वृत्तानुसार व्हीव्हीएस लक्ष्मण आयपीएलमध्ये परतू शकतो. लखनौ सुपर जायंट्सने लक्ष्मणची संपर्क साधला असल्याचेही समजत आहे. त्याला २०२५ मध्ये संघाच्या प्रशिक्षकाचा भाग म्हणून सामील करण्यासाठी त्याला संपर्क साधण्यात आल्याचे म्हटले जात आहे.

## मानोलो मार्केझ फुटबॉलचे नवे प्रशिक्षक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय फुटबॉल संघाला फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या तिसऱ्या पात्र फेरीत पोहचण्यात अपयश आले होते. त्यानंतर प्रशिक्षक इगोर स्टिमॅक यांची हाकालपट्टी करण्यात आली होती. आता यानंतर महिन्याभरातच भारताच्या पुरुष फुटबॉल संघाला नवा प्रशिक्षक मिळाला आहे. इंडियन सुपर लीगमध्ये एफसी गोवा संघाचे मुख्य प्रशिक्षक असलेल्या स्पेनच्या मानोलो मार्केझ यांना भारतीय पुरुष फुटबॉल संघाचेही मुख्य प्रशिक्षकपद सोपवण्यात आले आहे. स्टिमॅक यांची हाकालपट्टी केल्यानंतर अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनच्या कार्यकारी समितीची शनिवारी बैठक झाली आणि त्यात मार्केझ यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२४-२५ या मोसमासाठी मार्केझ एफसी गोवा, तसेच भारतीय संघ या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळतील. त्यानंतर ते केवळ भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक असतील. मार्केझ यांची नियुक्ती करताना त्यांच्या प्रशिक्षपदाचा कालावधी किती असेल, हे मात्र फेडरेशनने स्पष्ट केले नाही.




### फ्रँचायझी नवीन कर्णधार बनवण्याच्या विचारात

# लिलावापूर्वीच आयपीएलच्या बाजारात उडाला धुरळा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२५ साठी खेळाडूंचा मोठा लिलाव होणार असून अनेक आयपीएल फ्रँचायझी नवीन कर्णधार बनवण्याच्या विचारात आहेत. भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देणारा कर्णधार रोहित शर्मा आणि या फॉरमॅटचा नवा भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यावर नजर असणार आहे. मात्र, यावेळी रोहित शर्मा मुंबई इंडियन्सची साथ सोडणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.

आयपीएल २०२५ च्या आधी अनेक प्रकारच्या बातम्या समोर येत आहेत. आता असे सांगण्यात येत आहे की मुंबई इंडियन्ससाठी पाच वेळा आयपीएल चषक जिंकणारा रोहित शर्मा आयपीएल २०२५ पूर्वी फ्रेंचायझी सोडू शकतो. याचा परिणाम केवळ मुंबई इंडियन्सच नाही तर अनेक फ्रँचायझींवर होईल. तसेच, सूर्यकुमार यादवला टी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार बनवण्यात आले आहे, हे पाऊल भारतीय क्रिकेटच्या भविष्यासाठी उचलले असे मानले जात आहे. यावर्षी मुंबई इंडियन्सने रोहितला हटवून हार्दिकची कर्णधारपदी नियुक्ती केल्याची घोषणा केली होती, तेव्हा या दोन खेळाडूंमधील संबंध बिघडले होते. तर, सूर्या रोहितच्या जवळचा शानला जातो. अशा परिस्थितीत मुंबईला आता टी-२० मध्ये भारताचा कर्णधार असलेल्या सूर्याला कोणत्याही किंमतीत कायम ठेवावे लागेल.




याशिवाय, दिल्ली कॅपिटल्स ऋषभ पंतवर फारसे खूश नसून त्याला कायम ठेवायचे की नाही, याचा विचार करत असल्याचे समोर आले आहे. पंतला सोडण्याचा विचारही या संघात सुरू आहे. मात्र, या संघाचा मार्गदर्शक आणि माजी कर्णधार सौरव गांगुली पंतला कर्णधारपदावर ठेवण्याच्या बाजूने आहे. जर दिल्ली आणि पंत यांच्यातील चर्चा निष्फळ ठरली तर चेन्नई सुपर किंग्ज त्याला घेऊ शकते. तसेच, लखनौ आणि केएल राहुलचेही संबंध काही चांगले दिसत नाहीत. गेल्या आयपीएल हंगामात एका सामन्यानंतर संघाचे मालक संजीव गोयंका आणि कर्णधार राहुल यांच्यात मैदानावर झालेल्या चर्चेचा व्हिडिओ खूप गाजला होता. राहुल कर्नाटकचा असून आरसीबी त्याच्यावर सट्टा लावू शकतो.

यावेळी आयपीएलपूर्वी मोठा लिलाव होणार असल्याने आणि बीसीसीआयने खेळाडूंना कायम ठेवण्याचे नियम अद्याप जारी केलेले नसल्यामुळे त्यानंतरच सर्व काही ठरवले जाईल. कारण संघ त्यानुसार रणनीती बनवतील. एका परदेशी खेळाडूसह चार खेळाडूंना कायम ठेवण्याची परवानगी शिळाल्यास तीन भारतीय खेळाडूंना कायम ठेवण्याचा निर्णय मुंबईसाठी खूप कठीण जाणार आहे. या मेगा लिलावात पुढील पाच वर्षांसाठी सर्व संघ आपला संघ बांधण्याचा नक्कीच प्रयत्न करतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)